शुक्रवार, ३ मार्च २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१८६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●FRIDAY 03 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-186 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

# भाजपचा बालेकिल्ला गडगडला

## कसबा पोटनिवडणुकीत काँग्रेस उमेदवार रवींद्र धंगेकर विजयी



आधुनिक केसरी न्यूज

**पुणे : महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या कसब्याच्या पोटनिवडणुकीत काँग्रेस उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी भाजपच्या हेमंत रासने यांना पराभवाची धूळ चारली आहे. २८ वर्षांपासून भाजपच्या ताब्यात असलेल्या गडाला धंगेकरांनी सुरुंग लावला आहे. पहिल्या फेरीपासून शेवटच्या २१ व्या फेरीपर्यंत रवींद्र धंगेकर यांनी आघाडी कायम ठेवली. दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीचा अपवाद वगळता प्रत्येक फेरीत धंगेकर रासनेंना वरचढ ठरले. अगदी शनिवार-सदाशिव आणि नारायण पेठ भाजपचा बालेकिल्ला मानला जायचा त्यातही जनेतने धंगेकरांना साथ दिली.**

पुण्यातील १०० पेक्षा जास्त माजी नगरसेवक आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांची फौज आधीच हेमंत रासने यांच्यासाठी कामाला लागली होती. पण धंगेकारांचा झंझावात पाहता यांचा टिकाव लागत नसल्याने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पाच ते सहा मंत्री कसब्यात तळ ठोकून होते. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे देखील शेवटचे सहा दिवस कसब्यातच होते. इतकंच काय पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी कसब्यात घर घेऊन ते प्रत्येक अपडेटवर जातीने लक्ष ठेऊन होते. रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारासाठीही राज्यातील बड्या नेत्यांनी हजेरी लावली. मात्र धंगेकरांच्या भोवतीच निवडणूक राहील, याची पुरेपूर काळजी संबंधित नेत्यांनी घेतली. त्याचा परिपाक म्हणजे भाजपला ही निवडणूक मोदी-शहा विरुद्ध काँग्रेस अशी करण्याची संधी मिळालीच नाही. कसबा विधानसभा मतदारसंघाचे प्रामुख्याने दोन भाग पडतात. बाजीराव रस्त्याच्या अलीकडे आणि बाजीराव रस्त्याच्या पलीकडला भाग अर्थात पूर्व आणि पश्चिम भाग... पश्चिम भागामध्ये भाजपचा मतदार तर पूर्व भागात काँग्रेसचा मतदार असे मानले जाते. मात्र यापूर्वी दोन विधानसभा निवडणूक लढण्याचा अनुभव पाठीशी असलेल्या धंगेकर यांनी पश्चिम भागाबरोबरच पूर्व भागात देखील आपले अधिक लक्ष केंद्रित केले. घरोघरी जाऊन प्रचार करण्याची रवींद्र धंगेकर यांची पद्धत ही त्यांना फायदेशीर ठरली. त्या तुलनेत हेमंत रासने यांनी भाजपचं बलस्थान असलेल्या पूर्व भागात अधिक लक्ष केंद्रित केले. त्यामुळे पश्चिम भागातील मतदारांना आकर्षित करण्यात हेमंत रासने अपयशी ठरले.

## राष्ट्रवादी काँग्रेसला बंडाचा फटका; भाजपच्या अश्विनी जगताप विजय

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे** : चिंचवड मतदारसंघात भाजपची सरशी झाली असून अश्विनी जगताप यांनी 36 हजारांच्या मताधिक्याने विजय मिळवला आहे . चिंचवड पोटनिवडणुकीत तिहेरी लढत पाहायला मिळाली . अश्विनी जगताप यांच्याविरोधात राष्ट्रवादीचे नाना काटे आणि अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांचे आव्हान होते . महाविकास आघाडीला या निवडणुकीत कलाटेंच्या बंडखोरीचा फटका बसला आहे . चिंचवड पोटनिवडणुकीत तिरंगी लढत झाली . मतमोजणीच्या पहिल्या फेरीपासूनच अश्विनी जगताप यांनी आघाडी मिळवण्यास सुरुवात केली होती . तिरंगी लढतीचा फायदा अश्विनी जगताप यांना झाल्याचे दिसून आले . मतमोजणीच्या 37 व्या फेरीनंतर अश्विनी जगताप यांना 1 लाख 35 हजार 603 मते मिळाली . तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार नाना काटे यांना 99 हजार 435 मते मिळाली . महाविकास आघाडीचे बंडखोर उमेदवार, अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांना 44 हजार 112 मते मिळाली . अश्विनी जगताप या 36 हजार 168 मतांच्या फरकाने विजयी झाल्यात . भाजपचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर चिंचवड मतदारसंघाची जागा रिक्त झाली होती . या जागेवर पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली . भाजपकडून ही निवडणूक बिनविरोध करण्याचा खूप प्रयत्न झाला . पण अखेर महाविकास आघाडीने निवडणूक बिनविरोध न करता आपला उमेदवार घोषित केला . महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेसने नाना काटे यांना उमेदवारी जाहीर केली . पण उमेदवारीसाठी आग्रही असलेले राहुल कलाटे यांची नाराजी महाविकास आघाडीने ओढवून घेतली . अखेर भाजपकडून दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला . तर राष्ट्रवादीकडून नाना काटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला . पण नाराज झालेल्या राहुल कलाटे यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आणि चिंचवडमध्ये महाविकास आघाडीच्या अडचणी वाढल्या होत्या .



### महत्वाची बातमी

## वकिलाच्या विधानावर सरन्यायाधीश भडकले

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड आणि सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष विकास सिंह यांच्यात गुरुवारी जोरदार शाब्दिक चकमक उडाली. विकास सिंह यांनी बार असोसिएशनच्या जमीन प्रकरणाचा प्रश्न उचलला आणि हा प्रश्न यादीवर लागत नसल्याबाबत नाराजी व्यक्त केली. विकास सिंह यांनी हे प्रकरण सरन्यायाधीश, न्यायाधीश पीएस नरसिंहा आणि न्यायाधीश जेबी पार्डीवाला यांच्या खंडपीठासमोर उपस्थित करण्याची मागणी केली होती. मागच्या सहा महिन्यांपासून हा प्रश्न खंडपीठासमोर येत नाही आहे. मात्र विकास सिंह यांच्या मागणीवर सरन्यायाधीशांनी नाराजी व्यक केली. तुम्ही पाहताय एकही दिवस खंडपीठ मोकळं बसलं नाही, असे सांगत दोघांमध्ये शाब्दिक चकमक उडाली. बार आणि बेंच या वेबसाईटने दिलेल्या माहितीनुसार सरन्यायाधीश हे विकास सिंह यांच्यावर चांगलेच संतापले. विकास सिंह यांनी शांतपणे आपल्या जागेवर बसावे, असे चंद्रचूड यांनी बजावले. ते एवढ्या पुरतेच थांबले नाहीत. तर त्यांनी विकास सिंह यांना इशारा देत सांगितले, “मोठ्या आवाजात बोलायचे असेल तर माझ्या न्यायालयातून निघून जावे. हा विचार नका करु की तुमच्या भूमिकेमुळे खंडपीठ घाबरून जाईल.

## व्यापाऱ्यांची फसवणूक करणारा अटकेत

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** औषध निर्मातीसाठी लागणारा कच्चा माल ४८ व्यापाऱ्यांकडून उधारीवर घेऊन त्याची परस्पर विक्री करून ४५ कोटी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने दिल्लीतील एका व्यापाऱ्याला नुकतीच अटक केली. या अपहारात आरोपीने मदत केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा अधिक तपास करीत आहे. शरद विराणी (६९) असे अटक करण्यात आलेल्या व्यावसायिकाचे नाव आहे. तो नवी दिल्लीतील सरिता विहार येथील रहिवासी आहे. व्यावसायिक संजय संघवी यांच्या तक्रारीवरून याप्रकरणी २०१६ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## महाराष्ट्रात सर्वाधिक बेरोजगारांच्या आत्महत्या

### छगन भुजबळ : रोजगाराचा प्रश्न अतिशय गंभीर


आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : मुंबई : महाराष्ट्रात सर्वाधिक बेरोजगारांच्या आत्महत्या झाली आहे. राज्यातील तरुणांना रोजगाराचा प्रश्न अतिशय गंभीर असून उद्योग वाढविण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे अशी मागणी करत राज्यपालांच्या अभिभाषणात राज्यात उद्योगातील गुंतवणूक, रोजगार यासह अनेक महत्वाच्या योजनांबाबत कुठलीही स्पष्टता दिसत नाही असे मत राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करताना व्यक्त केले. मराठी राजभाषा दिनी राज्यपालांचे अभिभाषण झाले. राज्यपाल अभिभाषण करताना किमान काही ओळी तरी मराठीत बोलणे अपेक्षित होते.**

एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषा दिनाच्या दिवशीच बेळगाव येथील सभेत तिथे कन्नड भाषेतुन आपल्या भाषणाची सुरुवात केली. त्या बेळगावात आजदेखील मराठी भाषिक जास्त आहे. याकडे छगन भुजबळ यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. अर्थव्यवस्था कोरोनानंतर पुनर्जीवित करण्यासाठी युवकांना नोकऱ्या देणे हे माझ्या सरकारची पहिली प्राथमिकता आहे पण, कोविडची लाट कमी होताच मुख्यमंत्री आरोग्य कौशल्य योजना बंद पडली. १९ हजार जणांनी प्रशिक्षण घेतले. मात्र नोकऱ्या फक्त ४ हजार जणांनाच देण्यात मिळाल्या. राज्यात ७५ हजार नोकरभरती होत आहे. मात्र ग्रामविकास विभागाची भरती कधी सुरु होणार, आरोग्य विभागाची भरती कधी होणार असा सवाल उपस्थित करत ग्रामविकासच्या १३ हजार पदभरतीचा घोळ अजुनही सुरु असल्याची बाब छगन भुजबळ यांनी निदर्शनास आणून दिली. राज्यात प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेंतर्गत ४ लाख ८५ हजार युवकांचे प्रशिक्षण यशस्वीरित्या आयोजित केले. पण त्यांना नोकऱ्या देणार कोण, नोकरीच्या शोधात असलेल्या ५६ लाख ४० हजार तरुणांनी राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता, विभागाकडे नोंदणी केली मात्र त्यातल्या फक्त ३.८८ टक्के तरुणांना रोजगार संबंधित खात्याने दिल्या इतर तरुणांचे काय असा सवाल उपस्थित करत या योजनांचा ५४ कोटी रुपये निधी शिल्लक असल्याची बाब निदर्शनास आणून दिली.

> तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न अतिशय गंभीर होत चालला आहे . नॅशनल क्राईम रॅकॉर्ड ब्युरोने दिलेल्या आकडेवारीनुसार बेरोजगारीमुळे सर्वात जास्त आत्महत्या या महाराष्ट्रात होत आहेत . बेरोजगारीला जबाबदार कोण असा सवाल उपस्थित करत कारखाने वाढविले पाहिजे . बाहेर जाणारे कारखाने थांबविले पाहिजे . अद्यापही गुजरातमध्ये फॉक्सकॉन सुरु होऊ शकला नाही तो पुन्हा महाराष्ट्रात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे असेही छगन भुजबळ म्हणाले .







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932



# माती भिडली आभाळा

आधुनिक केसरी

खिस्ती धर्म जसा जगभर पसरला, तसा वारकरी पंथ पसरला असता, तर खिस्ताच्या क्रुसाप्रमाणे हा स्तंभही जगभर गेला असता. पण बरे झाले तसे नाही झाले ते. तो इथेच राहिला. वारकऱ्यांना त्याचे दर्शन घ्यायला इथेच यावे लागते. ' ज्ञानेश्वरी इथे सांगितली गेली म्हणून वारकरी संप्रदायाचे हे आद्य पीठ आहे. पण माऊलींनी ज्ञानेश्वरी सांगितल्यानंतर साधारणपणे तेरा ते एकोणिसाव्या शतकापर्यंत हे अत्यंत पवित्र असे स्थान विपन्नावस्थेत होते. संत ज्ञानेश्वरांची कर्मभूमी असलेले हे स्थान ! या स्थानाची लोकांना विस्मृती झाली होती. या स्थानाला उर्जितावस्थेत आणण्यासाठी एखाद्या समर्पित त्यागी साधकाची आवश्यकता होती. आज हे स्थान आपल्याला आपल्याला ऐश्वर्यसंपन्न भासते त्यामागे वारकरी संप्रदायाचे महान उपासक वै. सोनोपंत दांडेकर मामांचे शिष्य ह.भ.प. बन्सी महाराज तांबे यांचे मोठे योगदान आहे. पैठणहून आळंदीला जाताना ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपान आणि मुक्ताबाईंनी या ठिकाणी काही दिवस मुक्काम केला. असे म्हणतात की पैठणला ज्या रेड्याकडून ज्ञानेश्वर माऊलींनी वेद वदवून घेतले, तो रेडा देखील या ठिकाणी त्यांच्या सोबत होता. इथेच निवृत्तीनाथांनी ज्ञानोबा माऊलींना ज्ञानेश्वरी लिहिण्याची आज्ञा दिली. इथेच त्यांना तसे का वाटावं ? तर या स्थानाचा महिमाच तसा होता. या ठिकाणी साक्षात श्री विष्णूंनी मोहिनीरूपात दहा दिवस निवास केला होता. त्यांनी निवास केला म्हणून हे ' नेवासे ' असे म्हटले जाते. त्या मोहिनीराजांचं सुंदर हेमाडपंती मंदिर इथे आहे. समुद्रमंथनातून जेव्हा चौदा रत्ने बाहेर पडली, तेव्हा त्यात अमृताचा कलश हाती घेऊन धन्वंतरी प्रकट झाले. अमृत हे अमरत्व प्रदान करणारे होते. म्हणून देव आणि दानव यांच्यात अमृत वाटपावरून भांडणे सुरु झाली.



## आनंदी पहाट

# प्रत्येक बाबीकडे मानसशास्त्रीयदृष्ट्या बघावे

आधुनिक केसरी

मनाला रमवण्यासाठी आणि नवं आजमावण्यासाठी आपल्या अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. आपल्या मनाला नीट समजून घ्यावं लागतं. आपल्याच मनाचा अनेकदा आपल्याला अंदाज येत नाही. आपलं मन वर वर कितीही शांत वाटत असलं तरीही, काही वादळं आतल्याआत चालूच असतात, काहीवेळा अंतर्मनाला उध्वस्त करत असतात. विचारांचं थैमान सदोदित चालूच असतं, परंतू त्या विचारांना किनारा सापडत नसतो, वाट सापडत नसते. त्यामुळे काहीवेळा आपलीच वाट लागते. हे आपल्याला अनेकदा कळत असतं पण वळत नसतं, हीच तर उणिव असते. मनांत येणारी प्रत्येक बाब नवीन एक प्रश्न घेऊन येत असते. त्या प्रश्नामुळे आपलं मस्तक गरम होत असतं; पण काहीवेळा शोधूनही उत्तर सापडत नाही. कधी कधी उत्तर सोप्प असूनही आणि माहिती असूनही वेळेला सुचत नाही, कारण ते आठवत नाही. कालांतरानं परिस्थिती अशी येते कि, आपण जिंकलोय कि हरलोय तेच कळत नाही. आपल्या अंतर्मनाला पडलेल्या प्रश्नाचं उत्तर सापडलं, असं ठरवणंच कठीण होतं. निर्माण झालेल्या संभ्रमामुळे थोडं जे काही मिळालंय हे सगळ्यांना दिसत असतं, त्यामुळे हरलोय हे मान्य करायला जग तयार नसतं आणि जे मिळालंय ते असं काही मिळालेलं असतं कि, आपण जिंकलोय हे मान्य करायला आपलं मन तयार नसतं. पर्यायानं दुधाची तहान ताकावर भागवावी लागते, तीही घरातल्या बाकावर बसून; कारण मनाला आश्वस्त करेल अशी ती एकमेव हक्काची आणि सुरक्षित जागा असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**गाथा-ज्ञानेश्वरी | नित्य संग ||**

ग्रंथावीन नाही | उध्दार जीवाचा ||
अंत अज्ञानाचा | ग्रंथ करी ||१||
ग्रंथाने लाभते | आयुष्या पूर्णत्व ||
जाण हेचि तत्व | ग्रंथरूप ||२||
विवेकी माणूस | ग्रंथाने घडतो ||
अविवेक जातो | पळोनिया ||३||
ज्ञानदीप लावी | ग्रंथाचे पठण ||
नित्याचे वाचन | ज्ञान वाढे ||४||
ग्रंथ हेच गुरु | ग्रंथ हेच तारू ||
ग्रंथे अंगिकारू | दिव्य तेज ||५||
ग्रंथ दिंडीचा ह्या | व्हावे वारकरी ||
गाथा-ज्ञानेश्वरी | नित्य संग ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

मधुरभाषिणीमाभां लसन्तीं शिववल्लभाम् । भक्तकल्पलतां देवीं ललितां हसितां शुभाम् ।। मधुर भाषण करणारी, तेजस्वी, शोभायमान, श्रीशंकरवल्लभा, भक्तांची कल्पलता, शुभा, हास्यसमन्वित, अशा ललिता देवीला तुला मी वंदन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

काटे पर फिर फिर उगे, किशलय पल्लव चार । है अस्वस्थ माया जगत, फूल फलन विस्तार ।।३२।।(स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/३२

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

माया रूपी अश्वत्थ वृक्ष छाटल्या नंतरही त्यास पुन्हा चार नविन कोमल पाने फुटतात आणि त्याच्या फूल-फळांद्वारे पुन्हा या माया जगताचा विस्तार होऊ लागतो.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी

जे दुष्ट खल प्रव्रुत्तीचे आहेत पण श्रवणाचा निदीध्यास घेतला आहे असे लोक पुढे पुण्यात्मा बनतात. म्हणून कुठेही रामायण, महाभारत, दासबोधाचे वाचन,भागवत कथा,हरीकथा,पांडवप्रताप कथामाला असतील किंवा शिवाजी महाराजांच्या कथामाला असोत कोणत्याही विद्वान चारित्र्य संपन्न कथामाला असतील तिथे तिथे आवर्जून उपस्थित रहावे. आपण जे श्रवण करतो त्याच्या अर्थाकडे लक्ष देणे म्हणजे मनन होय.त्या अर्थावर मन किंवा लक्ष एकाग्र झाले की निदिध्यास साधला जातो.श्रवण केलेले आत्मसात करून जीवनात आनंद मिळतो. मित्रांनो आपण सगळी देहबुद्धीत रहाणारी माणसं आहोत,त्यामुळे काही मनाविरूध्द झाले की आपलें मन संशयाने ग्रस्त होते. "मी एवढं चांगलं वागते मग माझ्याचं नशीबी असं का"असा रोकडा सवाल निर्माण होतो. म्हणून त्याचे निरसन होण्यासाठी तरी पुन्हा पुन्हा संताकडून श्रवणकरणें आवश्यक असते.जेथे श्रवणं नसते तेथे साधकाने जास्त वेळ राहू नये. कारणं खरा परमार्थ तेथे घडत नाही.संत जे बोलतात ते ऐकून त्याचा अर्थ जर बरोबर असेल तर मन समाधान पावते. मुमुक्षु असो की साधक असो त्याने नित्य श्रवण केले नाही तर तो मूढ समजावा. श्रवणमननानें चित्तशुध्दी होते. अतरंगी निर्मळपणा येतो. म्हणून नित्यनियमाने श्रवण करावे साधना करावी. मनापासून प्रेम व भक्तीत रहावे. जसं आपणं एकदा जेवून भागत नाही पुन्हा पुन्हा जेवणं तहान ही लागतेचं तशीच परत परत भक्ती करा. नित्यनियमाने श्रवण करा आळस, श्रवणाची हेळसांड करणे म्हणजे स्वहिताला, आत्मकल्याणाला मुकणे होय.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# साधक व नाम

आधुनिक केसरी

प्रत्येक शब्दात रामच आहे असे ज्यांना वाटते त्यांची तयारी काही निराळीच असते. आपल्याला अमुक एका नावातच प्रेम येते; परंतु सिद्धांना मात्र कोणी कशाचाही उच्चार केला तरी नामाचाच केला असे वाटते. कोणत्या वाचेने नाम घ्यावे याचा नाही विचार करू. जसे होईल तसे नामस्मरण करा, पण नामाची कास सोडू नका. नाम घेऊन नामाचा अनुभव घ्या. विषयाचा घाला जेव्हा पडतो तेव्हा नामाची आठवण ठेवा. प्रल्हादाने नामाशिवाय दुसरे काय केले ? प्रल्हादाने नामावर जसे प्रेम ठेवले तसे आपण ठेवावे. आजवरच्या सर्व भक्तांनी हेच केले. एक नामस्मरण करा, हाच खरा मार्ग. स्मरणात रहा म्हणजे विषय आपोआप मरतील. साधकाने लोण्यासारखे मऊ असावे. कोणाला कुठेही खुपू नये, आपण हवेसे वाटावे. आपण निःस्वार्थी झालो तरच हे साधेल. कोणी आपल्या पाया पडताना, ‘मी या नमस्काराला योग्य नाही’ असे साधकाने मनामध्ये समजावे, म्हणजे कुणी नमस्कार केल्याचा



अभिमान वाटणार नाही, आणि न करणाऱ्याचा राग येणार नाही. सत्कर्मानंतर आपली स्तुती ऐकायला साधकाने तिथे उभेसुद्धा राहू नये. भगवंत ज्याला हवा आहे, त्याने असे समजावे की, आपण आता कुस्तीच्या हौद्यांत उतरलो आहोत, अंगाला माती लागेल म्हणून आता घाबरून चालायचे नाही. यासाठी चांगली माणसे पहिल्यानेच मातीत लोळतात, म्हणजे ती लाज जाते.

भगवंताच्या प्राप्तीचे दोन मार्ग आहेत : एक मार्ग म्हणजे, आजपर्यंत सर्व त्याच्या इच्छेने घडून आले, माझे जे सर्व आहे ते त्याचेच आहे, त्याचे तो पाहून घेईल, तो जे करील ते सर्वांच्या हिताचेच करील, उद्याचा दिवस त्याच्या इच्छेनेच यायचा आहे, असे मनाशी ठरवून आपण त्याच्या स्मरणात निश्चिंत राहणे हा होय. दुसरा मार्ग म्हणजे, ‘मी जगात कुणाचाच नाही, मी रामाचा आहे’ असे म्हणून कुठेही प्रेम न ठेवता त्याच्या स्मरणात राहणे हा होय. हा मार्ग जरा कठीण आहे. यामध्ये मनाने इतर ठिकाणचे प्रेम तोडून टाकायचे असते, कारण प्रेम एकाच वस्तूवर राहू शकते. मन जर आपले ऐकत नसेल तर न ऐकू द्या. आपण चांगले-वाईट शोधावे, आणि त्याप्रमाणे करू लागावे; मन आपोआप तिथे येईल. म्हणूनच, ‘आपले मन मारा’ असे न सांगता ‘आपले मन भगवंताकडे लावा’ असेच संत आपल्याला सांगतात. आजचे बोधवचन आहे - हेच माझे सर्वस्व आहे, असे नामात प्रेम असावे.

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

तुका म्हणे त्याचे काष्ठ हातपाय । कीर्तना नव जाय हरीचिया ॥५॥
आम्ही सदैव सुडके । जवळीं येतां चोर धाके ॥ जाऊं पुडी भिकें । कुतरीं घर राखती ॥१॥ नांदणूक ऐसी सांगा । नाहीं तरी वांयां भागा ॥ थोरपण अंगा । तरी ऐसें आणावें ॥ध्रु.॥ अक्षय साचार । केलें सायासांनी घर ॥ एरंडसिंवार । दुजा भार न साहती ॥२॥ धन कण घरोघरीं । पोट भरे भिकेवरी ॥ जतन तीं करी । कोण गुरें वासरें ॥३॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, ३ मार्च २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# शासनाच्या विविध विभागांच्या योजनांचा धुळे जिल्ह्यात चित्ररथाद्वारे जागर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांची चित्ररथ, एलईडी रथाच्या माध्यमातून गावागावांत जनजागृती होवून लाभार्थ्यांची संख्या वाढण्यास मदत होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सचिव जलज शर्मा यांनी आज येथे केले. शासनाच्या विविध विभागांच्या लोककल्याणकारी योजना धुळे जिल्ह्यातील चारही तालुक्यातील लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात यासाठी फिरता चित्ररथ तसेच एलईडी चित्ररथ तयार करण्यात आला आहे. आज या चित्ररथांना जिल्हाधिकारी शर्मा यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला. शासनाच्या विविध विभागाच्या योजनांची जिल्ह्यात प्रभावी जनजागृती व्हावी, याकरीता जिल्हा माहिती कार्यालयाने जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत सर्वसाधारण व विशेष घटक योजनेतून या चित्ररथांची निर्मिती केली आहे. या चित्ररथांचे जिल्हाधिकारी शर्मा यांच्या हस्ते फित कापून उद्धघाटन करण्यात आले. याप्रसंगी अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, जिल्हा नियोजन अधिकारी ममता हटकर, जिल्हा माहिती अधिकारी विलास बोडके, समाजकल्याण विभागाचे अधीक्षक मुकेश कानडे, जिल्हा माहिती कार्यालयाचे बंडू चौरे, चैतन्य मोरे, इस्माईल मणियार, भूषण सोनवणे, अरुण वंजारी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी शासनाच्या विविध योजनांची माहिती असलेल्या घडीपुस्तिकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत जिल्हा माहिती कार्यालयातर्फे चित्ररथ, एलईडीबरोबरच कलापथके, आकाशवाणी, एफएम रेडिओ, बस स्टॅन्ड, रेल्वे स्टेशनवर जिंगल्स, सोशल मिडीया, बॅनर, होर्डिंग्जच्या माध्यमातून शासनाच्या योजनांची प्रचार व प्रसिध्दी करण्यात येणार आहे.






# दक्षिण मध्य रेल्वेने कोट्यवधींच्या संपत्तीवर चालवले बुलडोजर; पुर्णेकरांना दाखवले गाजर !

## जगात जर्मनी भारतात परभणी अन् परभणीत पुर्णा ?






आधुनिक केसरी न्यूज

**दिनेश चौधरी**

**पुर्णा :** वेळेवर प्रयत्न केल्यास पुन्हा पश्चात्तापाची वेळ येत नसते वेळ निघून गेल्यानंतर केलेल्या निष्फळ प्रयत्नांसह झालेला पश्चात्ताप हा मागील काळात झालेल्या नुकसानीची सातत्याने आठवण करुन देत असतो.

पुर्णेकरांची एकंदर अश्याच प्रकारची दयनीय अवस्था झाल्याचे निदर्शनास येत असून दक्षिण मध्य रेल्वे विभागा अंतर्गत निजाम/ब्रिटीश काळापासून अत्यंत महत्वाचे रेल्वे जंक्शन व पुलींग पॉईंट असलेले पुर्णा जंक्शन पुर्वी सिकंद्राबाद/हैद्राबाद डिव्हीजन अंतर्गत असतांना पुर्णेत उपविभागीय स्तरावरील सर्वच प्रकारची महत्वाची कार्यालय या ठिकाणी कार्यान्वित होती परंतु मानापमान आणि राजकीय सुडसत्रात पुर्णा रेल्वे जंक्शनच्या वैभवाची सोईस्कररित्या अक्षरशः वाट लावण्यात आली पुर्णा जंक्शन येथे तब्बल १८० एक्कर जमीनीसह ९७१ निवासस्थान, २५ कार्यालयीन इमारती, ४ दोन मजली इमारती, ४ तिन मजली इमारती, २ सुसज्ज रुग्नालय, १ सर्व सुविधायुक्त कम्युनिटी हॉल, १ रेल्वे इस्टीट्यूट, इलेक्ट्रिक पॉवर हाऊस, १ स्वतंत्र पाणीपुरवठा योजना, १ भव्य रेल्वे लोको शेड वर्कशॉप, १ रेल्वे मराठी माध्यम शाळेसह ज्युनाअर कॉलेज, १ रेल्वे इंग्रजी माध्यम शाळा, १ रेल्वे तेलगू माध्यम शाळा, १ डि.ईएन ऑफिस, १ ए.ईएन ऑफिस, १ आय.ओ.डब्ल्यू ऑफिस, १ पि.डब्ल्यू ऑफिस१ टि.एक्स.आर ऑफिस, १ क्यू-बुकींग लॉबी, १ आर.पी.एफ पोलिस स्थानक, १ जिआरपी पोलिस स्थानक, १ टि.टी.ई.ऑफिस, सुसज्ज रेल्वे प्ले ग्राऊंड (मिनी स्टेडीएम) बॉस्केट बॉल प्ले ग्राऊंड, एरिया ऑफिस मिनी डिआरएम ऑफिस, कंट्रोल ऑफिस, रेस्ट हाऊस रनींग रुम, गुड्स शेड, २ पीट लाईन, मार्शल यार्ड, ब्रेक डाऊन कर्मचारी ऑफिस, ट्रेन लाईटींग स्टॉफ, ड्रायव्हर/गार्ड रनींग रुम आदी सुविधा उपलब्ध असतांना देखील येथील हक्काचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय (डिआरएम ऑफिस) नांदेडला एक एक्कर देखील जमीन किंवा कुठल्याही प्रकारच्या अन्य सुविधा उपलब्ध नसतांना पुर्णेतील रेल्वेच्या कोट्यावधी रुपयांच्या संपत्तीला मुठमाती देऊन नांदेड येथे कोट्यावधी रुपयांचा अतिरिक्त खर्च करीत दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाने विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय (डिआरएम ऑफिस) नांदेड येथे जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आले. दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनात कार्यरत भाषावाद/प्रांतवादाला खतपाणी घालणारे अधिकारी/कर्मचारी आणि मानापमानाच्या मुद्यावरुन पुर्णेकरांवर सुड उगवणाऱ्या असंतुष्ठ तत्वभ्रष्ट राजकारणी पुर्णा जंक्शनच्या विकसनशील वैभवावर एकामागून एक घाव घालीत असतांना जिल्ह्यातील आत्मघातकी संधीसाधू राजकारण्यांनी वेळोवेळी धृतराष्ट्राची भुमीका साकारल्यामुळे येणारा काळ पुर्णा जंक्शन/पुर्णेकर नागरिकांसह युवा पिढीच्या भविष्यासाठी अत्यंत भयावह असल्याने या सुडसत्रा विरोधात लोकशाही मार्गाचा अवलंब करुन सन १९९२/९३ पासून सतत संघर्ष करणाऱ्या पुर्णा तालुका संघर्ष समितीतील दुरदृष्टे जेष्ट कॉंग्रेस नेते स्व. भुजंगरावजी कदम, ओंकारसिंहजी ठाकूर, जेष्ठ रिपाई नेते प्रकाश कांबळे, जेष्ठ सामाजसेवक तथा आरोग्य तज्ञ डॉ.दत्तात्रयजी वाघमारे, जेष्ठ पत्रकार विजयजी बगाटे, जेष्ठ पत्रकार ॲड.संजयजी गव्हाणे, ॲड.अब्दुल सईद साहेब, जेष्स्वठ पत्रकार सतिषजी टाकळकर, जब्बारजी थारा, राजेंद्रबाबू कमळू यांनी शहरासह संपूर्ण तालुक्यातील व्यापारी संघटना, सामाजिक संघटनांसह राजकारणी मंडळी लोकप्रतिनिधींना वेळोवेळी सतर्क करण्याचा प्रयत्न तर केलाच याशिवाय दिल्लीपर्यंत धडक देऊन रेल्वे मंत्र्यांसह विविध केंद्रीय मंत्र्यांशी देखील संपर्क साधून त्यांना या संदर्भात सविस्तर माहितीसह निवेदनही दिली. या काळात दक्षिण मध्य रेल्वे प्रशासना विरोधात रेल रोको आंदोलन देखील करण्यात आले परंतु त्यांच्या या संघर्षाला व्यापारी संघटना/सामाजिक संघटनांसह जनमतातून निवडून आलेल्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी खंबीरपणे पाठबळ न दिल्यामुळे आज पुर्णा जंक्शनची अवस्था एखाद्या लोकल रेल्वे स्थानका प्रमाणे झाली असून साडेतीन/चार दशकापुर्वी ज्या पुर्णा जंक्शनवर तब्बल पाच हजार रेल्वे कर्मचारी कर्तव्य बजावत होते त्या मराठवाड्यातील सर्वात मोठ्या पुर्णा जंक्शन रेल्वे स्थानकावर बोटावर मोजण्या इतके कर्मचारी कर्तव्य बजावत असून परिसरातील दोनशें निवासस्थान दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाने जमीनदोस्त केल्यामुळे संपूर्ण परीसर भकास तर झालाच आहे याशिवाय गुन्हेगारांसाठी अभयारण्यासमान झाल्याचे निदर्शनास येते रेल्वे परिसरातील रेल्वे कर्मचारी पुर्वी राहत असलेली असंख्य निवासस्थान व महत्वाची कार्यालय अक्षरशः भुतबंगल्यात रुपांतरीत झाली असून या निवासस्थानांचा वापर अनैतिक व्यवहारांसाठी केल्या जात असल्यामुळे परिसरासह आसपासच्या परिसरातील रहिवासी/नागरीक दहशतीखाली वावरतांना निदर्शनास येत आहे.

दाक्षिण मध्य रेल्वे प्रशासना अंतर्गत येणाऱ्या मराठवाड्यात डिझेल रेल्वे गाड्यांचे रुपांतर आता इलेक्ट्रिक गाड्यांमध्ये होणार असल्यामुळे आता इलेक्ट्रिक लोको ट्रिप शेड पुर्णा जंक्शन येथे बनवण्यात येईल अशी अपेक्षा पुर्णेकरांतून व्यक्त केली जात होती परंतु पुर्णा जंक्शन रेल्वे स्थानकाला संपूर्णतः भकास करण्याचा विडा उचलणाऱ्या दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनातील भाषा/पांतवाद्यांसह राजकीय क्षेत्रातील असंतुष्ट आत्म्यांनी दि.२० जानेवारी २०२३ रोजी इलेक्ट्रिक लोको ट्रिप शेड नांदेड येथे स्थापण करण्याचे आदेश जारी करुन पुन्हा एकदा पुर्णेकरांच्या अपेक्षा अक्षरशः पायदळी तुडवल्यामुळे जनसामान्यांमध्ये तिव्र असंतोष पसरला आहे.



# सर्वोच्च निर्णय

आधुनिक केसरी

निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीसंदर्भात आज सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा निर्णय दिला आहे. मुख्य निडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांची नेमणूक पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश यांचा समावेश असलेल्या समितीच्या शिफारशीनुसार राष्ट्रपतींनी करावी, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. तसेच विरोधी पक्षनेते नसतील तर, तेव्हा संसदेतील सर्वात मोठ्या विरोधी पक्षाचे नेते या समितीचे सदस्य असतील असेही न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. गेल्या काही वर्षांपासून निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीवरून अनेकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केल होते. त्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय महत्त्वाचा मानला जातो आहे. निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तींबाबत सर्वोच्च न्यायालयाने संसदेला नवीन कायदा बनविण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच जोपर्यंत हा कायदा बनत नाही तोपर्यंत निवडणूक आयुक्तांची निवड करण्यासाठी पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांचा समावेश असलेल्या समितीद्वारे करण्यात यावी, असंही न्यायालयाने म्हटलं आहे. देशातील लोकशाही टिकवण्यासाठी निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता असणे आवश्यक आहे, अशी टीप्पणीही सर्वोच्च न्यायालयाकडून करण्यात आली आहे. दरम्यान, न्यायमूर्ती के. एम. जोसेफ यांच्या अध्यक्षतेखालील घटनापीठाने २४ नोव्हेंबर रोजी निकाल राखून ठेवला होता. निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या 'न्यायवृंद'सारखी (कॉलेजियम) यंत्रणा असावी का, यावर याचिकाकर्ते आणि सरकारच्यावतीने न्यायमूर्ती अजय रस्तोगी, न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस, न्यायमूर्ती हृषिकेश रॉय आणि न्यायमूर्ती सी. टी. रवींकुमार यांचा समावेश असलेल्या घटनापीठात जोरदार युक्तिवाद झाला होता.

# राजकीय पक्षाचा व्हीप म्हणजे काय ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**सध्या महाराष्ट्रातील राजकीय पेचप्रसंगाच्या पार्श्वभूमीवर व्हीपची जोरदार चर्चा सुरू आहे . अलीकडेच एकनाथ शिंदे यांनी आमदार भरत गोगावले यांची पक्षाच्या विधिमंडळात नवे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केल्याने व्हीप म्हणजे काय, अशीही चर्चा रंगली आहे. निवडणूक आयोगाने शिवसेना पक्षनाव आणि धनुष्यबाण या पक्षचिन्हासंदर्भात दिलेला निकाल सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे. निवडणूक आयोगाने शिंदे गटाच्या बाजूने निकाल दिल्यामुळे ठाकरे गटासमोर पेच निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाने थेट सर्वोच्च न्यायालयात याचिका सादर केली असून आयोगाच्या निर्णयावर स्थगिती आणण्याची मागणी याचिकेतून करण्यात आली आहे.**




ठाकरे गटाची याचिका दाखल करून घ्यायची की नाही याबाबत न्यायालयाने निर्णय घेतलेला नाही. . या पार्श्वभूमीवर आता ठाकरे गट आणि विशेषतः उद्धव ठाकरेंसमोर मोठा पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.

शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह शिंदे गटाला देण्याचा निर्णय आयोगाने दिला. त्यामुळे आता शिंदे गट हीच खरी शिवसेना असल्याच्या मागणीवर आयोगाने शिक्कामोर्तब केलं आहे. या पार्श्वभूमीवर पक्षनाव, पक्षचिन्ह यापाठोपाठ पक्षाची घटना, पक्षाच्या शाखा आणि पक्षघटनेनुसार लागू होणारे नियम या सर्वच बाबींवर शिंदे गटाकडून दावा सांगितला जात आहे. त्यामुळे एक पक्ष म्हणून लागू असणारे नियम आणि अधिकार शिंदे गटाला मिळाल्याचा अर्थ या निकालामधून काढला जात आहे.

या पार्श्वूमीवर शिंदे गटाने अर्थसंकल्पिय आधी अधिवेशनाला उपस्थित राहण्यासाठी पक्षाचा व्हीप जारी केला आहे. शिवसेनेचे प्रतोद गोगावले यांनी जारी केला आहे विशेष म्हणजे दोन आठवडे कोणीही व्हीप न बजावण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिलेले असतानाही हा व्हीप बजावण्यात आला आहे. हा न्यायालयीन लढाईचा भाग आहे.

संसदीय संसदेतील व्हीप म्हणजे एखाद्या पक्षाच्या सदस्यांना महत्त्वाच्या मतासाठी उपस्थित राहण्याचा किंवा त्यांनी विशिष्ट पद्धतीने मतदान करण्याचा लेखी आदेश असतो. हा शब्द पक्षाच्या पंक्तीला "चाबका मारणे" या जुन्या ब्रिटीश प्रथेवरून आला आहे.

**ते कसे वापरले जाते ?**

भारतातील सर्व पक्ष त्यांच्या सदस्यांना व्हिप जारी करू शकतात. पक्ष व्हीप जारी करण्यासाठी त्यांच्या सभागृहातील वरिष्ठ सदस्याची नियुक्ती करतात - या सदस्याला मुख्य चाबूक म्हणतात आणि त्याला अतिरिक्त व्हिपद्वारे मदत केली जाते.

सामान्यतः कोणताही पक्ष जेव्हा आपल्या सदस्यांना आदेश जारी करतो तेव्हा तो पक्षाच्या सदस्यांना मान्य करावा लागतो आणि प्रत्येक पक्षाला हे करावे लागते. याला व्हीप म्हणतात, जो पक्षाच्या आदेशाप्रमाणे असतो. व्हीप पाळला नाही किंवा पक्षाचा आदेश पाळला गेला नाही तर पक्ष आपल्या घटनेनुसार त्या व्यक्तीवर कारवाई करू शकतो. आता मुद्दा येतो की, सदस्याने उल्लंघन केल्यास काय होईल. पक्षपातळीवर व्हीपचे उल्लंघन केल्यास कारवाई करता येते, परंतु पक्षांतरविरोधी कायद्याचे उल्लंघन केल्यास कारवाई करता येत नाही. व्हिपचे उल्लंघन झाल्यास त्यांना पक्षातून काढून टाकण्याचा किंवा पुढच्या वेळी तिकीट न देण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो. अशा स्थितीत खासदार किंवा आमदार हे विधिमंडळाचे सदस्य राहतील.

**कोणत्याही लोकशाही निवडणुकीसाठी वेगळी व्यवस्था आहे का ?**

राज्यसभा निवडणुकीच्या वेळीही पक्षाकडून व्हिप जारी केला जातो, हे तुम्ही अनेकदा पाहिले असेल. तथापि, निवडणूक आचार नियम १९६१ च्या कलम ३९A(a) नुसार, या निवडणुकांमध्ये व्हीप पूर्णपणे लागू होत नाही. हे विधानसभेच्या अधिवेशनात लागू आहे, परंतु कोणालाही त्यात मतदान करण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही.

**चाबूक प्रकार :** एका ओळीचा व्हीप, एकदा रेखांकित केला जातो, तो सहसा पक्षाच्या सदस्यांना मताची माहिती देण्यासाठी जारी केला जातो आणि जर त्यांनी पक्षाच्या मार्गाचे पालन केले नाही तर त्यांना दूर राहण्याची परवानगी दिली जाते. दोन ओळींचा व्हीप त्यांना मतदानादरम्यान उपस्थित राहण्याचे निर्देश देतो. तीन ओळींचा चाबूक हा सर्वात मजबूत असतो, जो विधेयकाचे दुसरे वाचन किंवा अविश्वास प्रस्ताव यासारख्या महत्त्वाच्या प्रसंगी वापरला जातो आणि सदस्यांना पक्षाच्या पंक्तीचे पालन करणे बंधनकारक असते.**व्हीपची व्याख्या :** भारतात, तीन ओळींच्या व्हिपविरुद्ध बंड केल्याने खासदाराचे सदस्यत्व धोक्यात येऊ शकते. पक्षांतर विरोधी कायदा सभापती/अध्यक्षांना अशा सदस्याला अपात्र ठरवण्याची मुभा देतो; अपवाद म्हणजे जेव्हा एक तृतीयांशपेक्षा जास्त आमदार एखाद्या निर्देशाच्या विरोधात मत देतात, प्रभावीपणे पक्षाचे विभाजन करतात.

**आपल्या राजकीय व्यवस्थेत व्हीपचे महत्त्व :** सरकारच्या संसदीय स्वरुपात, विविध राजकीय पक्षांचे व्हिप हे पक्षांच्या अंतर्गत संघटनेत, विधिमंडळातील एक महत्त्वाचा दुवा असतात. संसद आणि राज्य विधानमंडळांचे कार्यक्षम आणि सुरळीत कामकाज हे व्हिपच्या कार्यालयावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. व्हीप्सला विधिमंडळातील पक्षांचे व्यवस्थापक म्हटले जाऊ शकते.

# लाईनमन - उजेड देणारा माणूस



विकास पुरी
संपर्क 9922150164

आधुनिक केसरी

**या मुलुखाची चिठ्ठी पर मुलुखातल्या आपल्या प्रियजणांपर्यंत पोहोचवणाऱ्या पोस्टमनची समाजाने पूर्वी पासून दखल घेतली. पोस्टमनच्या दैनंदिन आयुष्यावर प्रकाश टाकणारे अनेक सिनेमे, माहितीपट, मालिका निघाल्या. ज्यातून पोस्टमन घराघरांत पोहोचला. पण त्याच्याप्रमाणेच प्रकाशरुपी आनंद नित्यनेमाने देणारा 'लाईनमन' मात्र आजवर दुर्लक्षित राहिला होता. लाईट गेल्याशिवाय लाईटची किंमत कळत नाही असे म्हणतात. पण लाईट येऊनही ती कुणामुळे आली हे कुणी जाणून न घेतल्याने 'तो' कायम दुर्लक्षितच राहतो.**

कारण विजेचा धंदा हा तसा जोखमीचा. त्यामुळे कामातली चूक एखाद्याला जिवानीशी चुकवावी लागते. इथे जर-तर, चर्चा, हुशारी काही कामाची नसते. प्रत्येक कामात तितकीच जोखीम असते. इतके असूनही 'लाईनमन'च्या आयुष्यावर आजवर कोणी 'प्रकाश' टाकलेला नाही. मात्र केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने यावर्षीपासून ४ मार्च हा दिवस संपूर्ण देशभर 'लाईनमन दिवस' म्हणून साजरा करण्याचे निर्देशित केले आहे. या दिवसामुळे का होईना लाईनमन समाजाला समजेल आणि समाजही त्याला समजून घेईन.

मुंबईतला काही भाग वगळला तर सबंध महाराष्ट्राला वीज रुपी ऊर्जा पुरविण्याचे काम महावितरण ही सरकारी कंपनी करत आहे. नैसर्गिक आपत्ती, सामाजिक विरोध पत्करुन या कंपनीला कायम कार्यरत रहावे लागते. ग्राहक म्हणून आपल्याला कंपनीकडून अखंडितपणे वीज हवी असते. अगदी २४ तासांत एका मिनिटाचा जर खंड पडला तरी वीज यंत्रणेला टिकेचा धनी व्हावे लागते. पण ती यंत्रणा तुम्ही-आम्ही समजून घेत नाहीत. गेलेली वीज कोणीतरी रात्री-अपरात्री पोलवर झालेला बिघाड दुरुस्त केल्याशिवाय येत नाही. हा वायरचा उद्योग आहे. वायरलेसप्रमाणे याकडे पाहणे चुकीचे ठरेल. महावितरणचा विचार केला तर एकूण कर्मचाऱ्यांच्या तुलनेत जवळपास ८० टक्के कर्मचारी हे विजेच्या कामात थेट सामावलेले आहेत. ग्राहकाच्या मीटरपर्यंत वीज पोहोचविण्याचे काम प्रमुखतः लाईनमनरुपी कर्मचारी करत असतो. पदोन्नती आदी कारणांमुळे वीज कर्मचारी कंपनीत वेगवेगळ्या नावाने ओळखले जात असले तरी समाजासाठी तो फक्त लाईनमनच असतो.

६० च्या दशकात वीज प्रत्येकापर्यंत पोहाचलेली नव्हती. याउलट आज वीज नसलेलं घर शोधावं लागेल. महावितरणची ग्राहकसंख्या २ कोटी ९२ लाख असून, विजेचा वापर १ लाख २२ हजार दशलक्ष युनीटच्यावर पोहोचला आहे. रक्तवाहिन्यांप्रमाणे पसरलेलं हे विजेचे जाळे ११ लाख किलोमीटरचं झालंय. ४०९४ उपकेंद्रातून राज्याला २५ हजार मेगावॅट वीज पोहोचवण्याचं अखंड काम महावितरणचे हे लाईनमन अविरत करत आहेत. या अवाढव्य पसरलेल्या यंत्रणेची नियमित देखभाल, दुरुस्ती करण्याचे काम महावितरणचे ८१ हजार ७०९ कर्मचारी करतात. या जोखमीच्या कामात अनेकांना आपल्या प्राणाला मुकावं लागलं आहे तर शेकडो लाईनमन आजवर जायबंदी झालेत.

आता या क्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून 'लाईनवुमन'ची भरती झाली आहे. महिला असुनही त्या पुरुष कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने काम करत आहेत. या लाईनमन दिनाच्या निमित्ताने किमान यापुढे तरी स्वतःच्या जिवाची पर्वा न करता तुमच्या-आमच्यासाठी काम करणाऱ्या लाईनमनला, त्याच्या कामाला प्रतिष्ठा मिळेल, ही आशा आहे. त्यांच्या या कामात त्यांनी सुरक्षेचा अवलंब करावा, स्वतः च्या आयुष्याची काळजी घेऊन ह्या महाराष्ट्राला आणखी ऊर्जावान राज्य बनवावे, ह्याच शुभेच्छा !



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# १२ हजार शेतकऱ्यांचे बँकखाते गोठवणाऱ्या बजाज अलियांज विमा कंपनीवर गुन्हे दाखल करा

## धनंजय मुंडे : सीबील बिघडणार नाही याची काळजी घेऊन बँकखाते पूर्ववत करून द्या

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** बीड जिल्ह्यातील बारा हजार शेतकऱ्यांचे बँक खाते बजाज आलियांज या विमा कंपनीने चुकीचा पीक विमा जमा झाल्याचे कारण देत गोठवले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रचंड मानसिक त्रास झाला तसेच त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या सिबिलवरही झाला. अशा प्रकारे शेतकऱ्यांचे बँक खाते बँकेला कळवून गोठवणे हे बेकायदेशीर असून संबंधित कंपनीवर शासनाने गुन्हे दाखल करून दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी विधानसभेत स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून केली. खरीप हंगाम २०२२ मधील विमाधारक शेतकऱ्यांपैकी सुमारे १२ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर एकूण १२ कोटी रुपये रक्कम बजाज अलियांज विमा कंपनीने जमा केले होते. मुळात शेतकऱ्यांना पात्र असूनही विमा मिळत नाही आणि त्यात काही शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले तर एवढा मोठा व्यवहार करणारी विमा कंपनी जेव्हा शेतकऱ्यांच्या खात्यावर चुकून पैसे आल्याचे सांगते हे अत्यंत अव्यवहारी आहे असेही धनंजय मुंडे यांनी यावेळी नमूद केले.




ऐन अडचणीच्या काळात बँक खाते गोठवल्यामुळे शेतकऱ्यांना स्वतःच्या खात्यावरील जमा पैसे उचलता येत नव्हते. त्या काळात विमा जमा झालेल्या शेतकऱ्यांची संख्या पाहता ते १२ हजार शेतकरी नेमके कोणते, याबाबतही संभ्रम असल्याने अनेक शेतकऱ्यांना प्रचंड मानसिक त्रास झाला. तसेच विमा कंपनीच्या चुकीच्या वसुली धोरणामुळे अनेक शेतकऱ्यांच्या सिबिलवरही परिणाम झाला व त्याचा त्रास भविष्यात शेतकऱ्यांना कर्ज घेताना होऊ शकतो असेही धनंजय मुंडे म्हणाले. विमा कंपनीच्या या बेकायदेशीर कारवाईविरुद्ध राज्य शासनाने विमा कंपनी विरोधात गुन्हे दाखल करावेत, तसेच संबंधित शेतकऱ्यांच्या सिबिलवर कोणताही परिणाम होणार नाही, याबाबत आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश विमा कंपनीला द्यावेत व विमा कंपनीने केलेल्या चुकीमुळे शेतकऱ्यांना जो त्रास झाला, त्याबाबत विमा कंपनीवर दंडात्मक कार्यवाही करावी अशी मागणी स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून धनंजय मुंडे यांनी केली. यावर राज्य सरकारच्यावतीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विषयाची नोंद घेतली असून योग्य ती कारवाई तातडीने केली जाईल, असे आश्वासन सभागृहात दिले.

# संजय राऊतांवरील कारवाईबाबत नव्याने गठीत केलेली समिती तटस्थ स्वरूपाची असणे अपेक्षित

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकशाही व्यवस्थेतील विधिमंडळ हे जनतेचे सर्वोच्च प्रतिनिधी मंडळ आहे आणि त्याची मान-प्रतिष्ठा राखली गेलीच पाहिजे. यात दुमत असण्याचे कारण नाही. मात्र संजय राऊतांवरील प्रस्तावित हक्कभंगाच्या कारवाईबाबत नव्याने गठीत केलेली हक्कभंग समिती स्वायत्त व तटस्थ स्वरूपाची असणे अपेक्षित होते असे स्पष्ट मत राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार आदरणीय शरद पवार यांनी ट्वीट करत व्यक्त केले आहे. कोल्हापुरात खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना 'ही जी बनावट शिवसेना आहे, डुप्लीकेट, चोरांचं मंडळ, चोरमंडळ, हे विधिमंडळ नाही चोरमंडळ आहे.' हे विधान केले. यावर विधिमंडळाला चोरमंडळ म्हटल्याबद्दल हक्कभंग प्रस्ताव मांडला गेला आहे. तसेच गठीत केलेल्या समितीत ठाकरे गटातील आमदारांचा समावेश नाही. हे योग्य नाही. संजय राऊत



यांचे विधान ऐकले असता त्यांच्या म्हणण्याचा रोख दिसून येतो असेही शरद पवार म्हणाले. खासदार संजय राऊत यांचे हे विधान मूलतः विशिष्ट गटाविषयी व्यक्त केलेली प्रतिक्रिया आहे. संजय राऊत यांनी जे विधान केले त्या विधानाचा विग्रह न करता ते एकत्रितरित्या वाचले अथवा ऐकले असता विधानाचा अन्वयार्थ स्पष्ट होतो असेही शरद पवार यांनी म्हटले आहे. यापूर्वी वसंतदादांच्या कार्यकाळात महाराष्ट्रातील सरकारवर 'अलीबाबा-चाळीस चोरांचे सरकार' अशी टीका-टिप्पणी विरोधकांकडून झाली होती. अशा प्रकारची टीका विधिमंडळाबाबत कधी ही समर्थनीय नाही. परंतू प्रकरण संयमाने हाताळावयास हवे. संजय राऊत यांनी केलेले विधान विधिमंडळाबाबत होते की विशिष्ट गटाबद्दल होते याचा त्यांनी केलेल्या विधानाचा एकत्रितरित्या विचार व्हावा याकरता हक्कभंग समितीतील सदस्य निःपक्षपाती, ज्येष्ठ असावेत याबाबत आवश्यक काळजी घ्यायला हवी होती अशी नाराजीही शरद पवार यांनी व्यक्त केली आहे. ज्या सदस्यांनी सभागृहात हक्कभंगाची मागणी केली एवढेच नव्हे तर संजय राऊत यांच्यावर कडक कारवाईची आग्रही मागणी केली त्या तक्रारदार सदस्यांचा हक्कभंग समितीत समावेश झाला. हे म्हणजे तक्रारदारासच न्यायाधीश म्हणून नियुक्त केले.. तर न्यायाची अपेक्षा कशी करता येईल ? असा सवालही शरद पवार यांनी उपस्थित केला आहे. संजय राऊत हे देशातील सर्वोच्च विधिमंडळ अर्थात भारतीय संसदेतील राज्यसभेचे ज्येष्ठ व सन्माननीय सदस्य आहेत. त्यांवरील कोणत्याही प्रस्तावित कारवाईपूर्वी भारतीय संसदेतील सदस्यांवर अशी कारवाई करण्याबाबतची विधिग्राह्यता तसेच मार्गदर्शक सूचना या बाबी बारकाईने तपासून घ्यावयास हव्या असेही शरद पवार म्हणाले आहेत.

# आठ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** मंगळवारी गृह विभागातर्फे राज्यातील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये बऱ्याच दिवसांपासून बदलीच्या प्रतीक्षेत असलेल्या ८ आयपीएस अधिकाऱ्यांना अखेर पोस्टिंग मिळाली आहे. त्यामध्ये आयपीएस बिपिनकुमार सिंह यांची आर्थिक गुन्हे शाखेच्या अपर पोलिस महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे तर आयपीएस प्रभात कुमार यांना होमगार्डची जबाबदारी देण्यात आली आहे. यासोबतच नांदेड विभागाच्या पोलिस उपमहानिरीक्षकपदी एस. एच. महावरकर यांची नियुक्ती करण्यात आली. बिपीनकुमार सिंह यांची नियुक्ती आर्थिक गुन्हे शाखेच्या अप्पर पोलिस महासंचालकपदी करण्यात आली, तर राजकुमार व्हटकर यांची विशेष पोलिस महानिरीक्षक प्रशिक्षण व खास पथकेपदी नियुक्ती करण्यात आली. विनीत अग्रवाल यांची म्हाडाच्या अपर पोलिस महासंचालक व मुख्य दक्षता अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली. प्रभात कुमार यांची उपमहासमादेशक होमगार्डपदी नियुक्ती करण्यात आली. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या विशेष पोलिस महानिरीक्षकपदी जय जाधव यांची नियुक्ती करण्यात आली, तर कैसर खालिद यांची मोटार परिवहन विभागाच्या विशेष पोलिस महानिरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. डी के पाटील भुजबळ यांची गुन्हे अन्वेषण विभागाच्या विशेष पोलिस महानिरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. याचसोबत राज्यातील इतर अधिकाऱ्यांच्याही बदल्या करण्यात आल्या. त्यामध्ये अभिजीत शिवथरे यांना कायदा आणि सुव्यवस्था विभागाच्या सहायक पोलिस महानिरीक्षकपदी नियुक्ती देण्यात आली आहे, तर पौर्णिमा चौगुले यांना मीरा-भाईंदर-वसई-विरारच्या पोलिस उपायुक्तपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. राहुल खाडे यांची बदली जालना जिल्ह्याच्या अपर पोलिस अधिक्षकपदी करण्यात आली. या आधी १५ दिवसांपूर्वी राज्यातील वरिष्ठ आयएएस अधिका-यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यानंतर आता आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या.



# हल्ला करणारा बिबट अखेर जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** भद्रावती येथील आयुध निर्मानी चांदा येथील सेक्टर ५ मध्ये सायंकाळच्या सुमारास फिरायला निघालेल्या एका महिलेवर हल्ला करून जखमी करणारा बिबट गुरुवार २ मार्चच्या पहाटे पावणे ५ वाजताच्या सुमारास पिंजऱ्यात अडकला. सदर बिबट्याला चंद्रपूरच्या सिटीसी केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून उपचारानंतर त्याला जंगलात सोडण्यात येणार आहे. २० फेब्रुवारीला सायंकाळी आयुध निर्मानी चांदाच्या वसाहतीतील विमलादेवी टीकाराम या ४२ वर्षीय महिलेवर बिबट्याने हल्ला करून गंभीर जखमी केले होते. त्यासाठी वनविभागाने सेक्टर पाच मध्ये वेगवेगळ्या तीन ठिकाणी पिंजरे लावले होते. आज पहाटे ४:४५ वाजताच्या सुमारास अखेर तो बिबट पिंजऱ्यात जेरबंद झाला. बिबट्याला काही ठिकाणी जखमा असल्याने चंद्रपूरच्या सीटीसी केंद्रात उपचारासाठी रवाना केले. सदरची कारवाई सहा.वनसंरक्षक आदेशकुमार शेंडगे, एच.पी. शेंडे, अंकुश येवले, शिंदे, वनरक्षक धनराज गेडाम यांनी केली.

# त्रिरत्न बौद्ध विहारासाठी दीड कोटींचा निधी मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपूर शहरातील क्रांतीनगर येथील `त्रिरत्न बुद्ध विहार` नव्याने बांधकाम करण्यासाठी दीड कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतून मुख्यत्वे प्रशस्त बुध्द विहारांची नव्याने बांधकामांसहित प्रशस्त व भव्य दिव्य अश्या विहाराची निर्मिती होणार आहे. प्राथमिक टप्प्यात सुमारे 30 लक्ष रुपये मंजूर झाले असून. शिरपूर तालुक्यातील धम्मचळवळीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा निर्णय आहे. शिरपूर तालुक्याचे आदरणीय अमरीश भाई पटेल व शिरपूर



वरवाडे नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. जयश्रीबेन अमरीशभाई पटेल, आदरणीय भूपेश भाई पटेल यांचे तमाम आंबेडकरी जनतेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले आहे.

महाराष्ट्र Business Katta












# देशातील घरकामगारांना गुलामाची वागणूक



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**देशातील ९१ लाखांपेक्षा अधिकच्या घरकामगारांना कामाच्या ठिकाणी गुलामाची वागणूक मिळत असल्याची बाब एका संशोधनातून समोर आली आहे. आपल्या मागण्यांविषयी घरेलू कामगारांनी अलिकडेच नॅशनल प्लॅटफॉर्म फॉर डोमेस्टिक वर्कर्सच्या बॅनरखाली २० हून अधिक राज्यांत आंदोलन केले होते. घरकाम करणाऱ्यांकडून घरातील धुणी, भांडी, कचरा, लादी, डस्टिंगपासून सगळी कामे केली जातात. मात्र या कामाचे पैसे न ठरल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला वेगवेगळा मोबदला मिळतो.**

अनेकदा हा मोबदला घरकामगार काय मागणी करतो, ज्याच्या घरी काम करायचे त्याचे बार्गेनिंग स्किल अशा गोष्टींवर अवलंबून असतो. घरकामगारांना मिळणारा पगार हा शहरांमधील सामाजिक आर्थिक स्तरानुसार ठरतो. बंगळुरूतील कंपनी बाबाजॉब.कॉमच्या सर्व्हेनुसार, भारतात काम करणाऱ्यांना घरकामगारांना दरमहा १० हजारांपेक्षा कमी रुपये मिळतात. अहमदाबादमध्ये यांना दरमहा ६५०० रुपये मिळतात. तर मुंबईतील घरांत काम करणाऱ्यांना ७५०० रुपयांपर्यंत मिळतात. कोलकात्यात हे सर्वात कमी ५००० रुपये आहे. छोट्या शहरांत हा पगार ३००० ते ४००० दरम्यान असतो. मोठ्या शहरांमध्ये झारखंड, रांची, आसाम, ओडिशा या राज्यांमधून महिला विस्थापित होऊन येतात. या महिलांमध्ये आदिवासी महिलांचे प्राबल्य आहे. यामध्ये मानवी तस्करीचाही समावेश होतो. झारखंड, ओडिशा, छत्तीसगड आणि पश्चिम बंगालमध्ये चांगले जीवन, अधिक पैसा आणि शिक्षणाचे आमिष दाखवून आदिवासी मुलींना जाळ्यात ओढले जाते. या मुली पुढे देशाच्या महानगरांमधल्या श्रीमंत कुटुंबांमध्ये कामासाठी पाठवल्या जातात. ही एक प्रकारची मानवी तस्करीच आहे. या मुलींचा जगण्याचा नैसर्गिक हक्कच हिरावला जातो. स्वतंत्र बंगले, गगनचुंबी अपार्टमेंट्स, दुकाने आणि स्पा अशा ठिकाणी त्यांना अत्यंत स्वस्तात कामाला लावले जाते. ही नवी जीवनशैली त्यांना भूलवणारी असते. आपल्या आयुष्याचे कल्याण झाले, अशा भावनेने श्रीमंत घरांमध्ये कामाला लागणाऱ्या या मुली पुढे आपोआप शोषणाच्या सापळ्यात अडकत जातात. त्यांच्याकडून अठरा-अठरा तास काम करून घेतले जाते. पुरेसे अन्न, कपडे न देता कित्येक महिने विनावेतन राबवले जाते आणि काही वेळा तर मालकांच्या बलात्कारातून या मुली गर्भवतीही होतात. घरकामासाठी आणल्या गेलेल्या महिलांना कधीकधी देहविक्रीमध्येही ढकलले जाते. वाढत्या शहरीकरणाबरोबर हा प्रश्न वेगाने वाढतो आहे आणि त्या तुलनेत तो सोडवण्यासाठी होणारे प्रयत्न अपुरे आहेत. या महिलांची नोंदणी नसते. बनारस हिंदू विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे प्राध्यापक एक जोशी सांगतात की डोमेस्टिक हेल्परशी क्रूरता सर्वच लोक करत नाही. हेल्पर्सचा छळ करणारे लोक मानसिकरित्या कुंठित आणि आजारी असतात. हेल्पर्सचा छळ करून त्यांनाच आनंद मिळतो जे लोक जीवनात यशस्वी होत नाही किंवा काही विशेष न करू शकण्याच्या भावनेने कुंठित असतात. घरात कुठलीही चोरी झाली तर सर्वात आधी शंकेची सुई वळते ती घरकाम करणाऱ्यांवरच. घरातील आर्थिक व्यवहार, मौल्यवान वस्तू यांच्याविषयी सर्वतोपरी माहिती त्यांच्याकडे असते त्यामुळेच पोलिसांकडून त्यांच्यावर संशय व्यक्त करण्यात येतो असे पोलिसांकडून सांगण्यात येते. घरात होणाऱ्या चोऱ्या असोत की खुनासारखे



गंभीर अपराध, यात ३० टक्के सहभाग कुटुंबातील सदस्यांचा असतो, हे सिद्ध झाले आहे. तरीही केवळ गरीब आणि असहाय्य घरकामगारांना लक्ष्य केले जाते. केंद्रीय श्रम मंत्रालयानुसार देशात ९१ लाखांहून अधिक डोमेस्टिक वर्कर्स आहेत, जे ई- श्रम पोर्टलवर नोंदणीकृत आहेत. नॅशनल अलायन्स फॉर डोमेस्टिक वर्कर्सच्या संस्थापक रेखा सिंह सांगतात की घरात काम करणाऱ्या महिलांसोबत मारहाण, शिवीगाळ आणि कधी-कधी तर लैंगिक शोषणही केले जाते. त्यांना ठरवलेला पगार मिळत नाही. त्या आजारी पडल्यावर पगारातून पैसे कापले जातात. महिन्याला अमुक एक रक्कम घरातल्या कामवाल्या बाईच्या हातात टेकवली म्हणजे प्रश्न मिटला. तिने सुट्टी घ्यायची नाही, अडीअडचणीला पैसे मागायचे नाहीत. रजा घेतली तर हमखास पैसे कापणारच... वर्षोनुवर्ष मालकांकडून घरकामगारांना याच पद्धतीने वागवले जात आहे. हातावर पोट असलेला हा कष्टकरी वर्ग दाद मागायला कुणाकडे जाणार, असाच मालकांचा समज. त्यांना कोणत्याही प्रकारची सामाजिक सुरक्षा दिली जात नाही. घरकामगारांना आर्थिक सुरक्षा देण्यासाठी घरेलु कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. घरकामगारांच्या काही संघटना आणि काही समाजसेवी संस्था घरकामगारांच्या हक्कांसाठी आता लढताना दिसत आहेत. जसे सोलापुरातील महिला शिक्षिकांनी एकत्रयेवून काही वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या ऍचिव्हर्स महिला असोसिएशनच्या माध्यमातून घरकाम करणाऱ्या महिलांसाठी सकारात्मक काम चालू आहे. एका अर्थाने घरकामाला प्रतिष्ठा मिळण्याचाही भाग आहे. कारण घरकाम म्हणजे फक्त कामाची पद्धत, त्याचे अर्थशास्त्र व त्याविषयीचे कायदे इतकीच मर्यादित चर्चा नसून तो स्त्री व कामाच्या ठिकाणी तिला मिळणाऱ्या विषम वागणुकीचाही अभ्यास आहे. घरकामगारांचे काम हे नेहमी किंमत शून्य का असते व तिला गृहति का धरले जाते, स्त्रियांनी करायचे काम हे नेहमी घरगुती व दुय्यम दर्जाचे का असावे ? घरकाम करणाऱ्या बहुतांश महिलांच्या घरची आर्थिक स्थिती चांगली नसते. त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विविध व्यवसाय मार्गदर्शनपर कार्यक्रम, पाल्यांच्या शिक्षणासाठी शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, त्यांना प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नकरणे गरजेचे आहे. एक संवेदनशील समाज म्हणून त्यांची ही गरज समजून त्यांचे जगणे थोडे सुकर व्हावे म्हणून आपण मदत तर नक्कीच करू शकतो.

# भगवान गौतम बुद्धांची शिकवण

आधुनिक केसरी

**ही गोष्ट त्यावेळची आहे जेव्हा भगवान गौतम बुद्ध विश्वभ्रमण करत होते आणि शांती व अहिंसेची शिकवण लोकांना देत होते. एकदा महात्मा भगवान गौतम बुद्ध आपल्या काही शिष्यांसमवेत एका गावात भ्रमण करत होते. त्यावेळी कोणतेही वाहन नसल्याने ते आणि त्यांचे शिष्य पायीच यात्रा करत असत. असचं भ्रमण करता करता त्यांना खूपच उशीर झाला. भगवान गौतम बुद्ध एका झाडाखाली बसले. त्यांना खूपच तहान लागली होती. त्यांनी आपल्या एका शिष्याला पाणी आणण्याची आज्ञा दिली. त्याबरोबर तो शिष्य पाणी आणण्यासाठी शेजारीच असलेल्या नदीवर गेला. परंतु तिथे गेल्यावर त्याला वेगळेच दृश्य दिसले. त्याने पाहिले की, गावातील काही लोक त्या पाण्यात आपली जनावरे धूत आहेत, काही लोक आपले कपडे धूत आहेत, लहान मुले त्या पाण्यात खेळत आहेत, त्यामुळे ते पाणी खराब आणि गढूळ झाले होते.**



त्यामुळे त्या शिष्याला वाटले की, आपल्या गुरुसाठी असे घाण आणि खराब पाणी घेऊन जाणे उचित नाही. त्यामुळे हा विचार करून तो तसाच पाणी न घेता परत आला. भगवान गौतम बुद्धांनी त्याला विचारले की, तू पाणी का नाही आणलेस...?

त्यावर त्याने सांगितले कि, तिथे नदीत काही जण कपडे धूत होते, काही मुले त्यामध्ये आंघोळ करत होती, काही लोक त्या पाण्यात त्यांची जनावरे धूत होती, त्यामुळे पाणी खूपच खराब आणि गढूळ झाले होते. तुम्हाला असले खराब पाणी कसं द्याव...? असा विचार करून मी पाणी न घेताच परत आलो. त्या शिष्याचे बोलणे ऐकल्यावर भगवान गौतम बुद्धांनी आपल्या एका दुसऱ्या शिष्याला पाणी आणण्यासाठी पाठवले. गुरूची आज्ञा मानून तो शिष्य पाणी आणण्यासाठी नदीच्या दिशेने वाटचाल करू लागला. थोड्या उशिरानेच तो एका भांड्यात पाणी घेऊन आला. भगवान गौतम बुद्धांनी त्याला विचारले कि, पाणी तर खराब होते, तरीदेखील तू स्वच्छ पाणी कसा घेऊन आलास...?

त्यावर तो शिष्य म्हणाला की, प्रभू ही गोष्ट खरी आहे कि, त्या नदीतील पाणी खराब होते, परंतु मी तेथे तोपर्यंत थांबलो, जोपर्यंत ती लहान मुले, त्या स्त्रिया, ते लोक त्या नदीतून बाहेर येत नाहीत. ज्यावेळी ते बाहेर आले, त्यावेळी थोड्या वेळाने आपोआपच त्या नदीच्या पाण्यातील माती हळूहळू खाली जाऊ लागली आणि स्वच्छ पाणी दिसू लागले. ज्यावेळी ते पाणी एकदम स्वच्छ झाले, त्यावेळी मी ते आपल्यासाठी घेऊन आलो. भगवान गौतम बुद्ध त्या शिष्याचे हे उत्तर ऐकून एकदम प्रसन्न झाले. त्यांनी सर्व शिष्यांना एक शिकवण दिली कि, आपले जीवनदेखील असचं पाण्यासारखे आहे. ज्यावेळी आपले कर्म चांगले आहे, त्यावेळी आपले जीवनदेखील त्या स्वच्छ पाण्याप्रमाणे असते. परंतु कधी कधी आपल्या जीवनात देखील काही अडचणी, पिडा, समस्या येतात आणि त्या आपले जीवन खराब आणि गढूळ करून टाकतात, ज्याप्रमाणे ते स्वच्छ पाणी खराब आणि गढूळ होते.

काही लोक जीवनात समस्या आल्यावर लगेच घाबरून जातात आणि आपल्या ध्येयापासून परावृत्त होतात. असे लोक त्यांच्या जीवनात कधीही यशस्वी होत नाही. तर दुसरीकडे काही लोक त्यांच्या जीवनात कितीही संकटे आली, समस्या आल्या तरी धैर्य ठेवतात, संयम ठेवतात आणि शांत राहून त्याचा सामना करतात. असे लोक त्या समस्येवर नक्कीच मात करतात आणि जीवनात पुढे जात राहतात. त्यांना त्यांच्या संयमाचे फळ नक्कीच मिळते. आपल्या जीवनात काही समस्या, काही अडचणी आल्या तरी आपण न डगमगता त्याचा धैर्याने मुकाबला करा. ते दुःख, संकट काही वेळाने निघून जाईल, जसं ते गढूळ पाणी थोड्या वेळात स्वच्छ होते. त्यामुळे संयम ठेवा. भगवान गौतम बुद्धांनी सांगितल्याप्रमाणे संयमाचे फळ आपल्याला नक्कीच मिळेल.

# परमार्थिक दिसण्यापेक्षा असणं गरजेचं




गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**सृष्टीवरील जीवमात्रांच हित स्वहिता पेक्षा श्रेष्ठ समजुन परोपकारी वृत्ती ने लोककल्याण करण्यासाठी निस्वार्थ भावनेने समर्पित भाव ठेवून आपल्या कार्यक्षेत्रात कार्य करण. कार्य क्षेत्र कोणतही असेल महत्व क्षेत्राला नाही तर आपण तिथे कार्य करत असताना आपला भाव आपली वृत्ती आणि लोकहित लोक कल्याण होण महत्वाचं. कार्य करताना आपला भाव हाच अंतिम महत्वपूर्ण असला पाहिजे. लोक कल्याण लोक हित परकोपकार हेच सर्वपरी असल पाहिजे.**

स्वहित, स्वकल्याण महत्वाकांक्षा, आशा, अपेक्षा स्वार्थ, मोह याचा एतकिंचत सुद्धा लवलेश नसला पाहिजे अशी स्वतःची वृत्ती तयार करणं अथवा असं व्यक्तिमत्त्व होण्यासाठी प्रयत्न करणं परमार्थ हा शब्द समजण्यासाठी सोपा तितकाच आहे जितका तो अवघड आहे. परमार्थ हा शब्द दिवसातुन अनेकदा, अनेक वेळा कित्येक वेगवेगळया ठिकाणी आपल्या कानावर पडतो. बहुतांश लोक मला परमार्थ करायचा आहे म्हणून नानाविध मार्ग शोधत आहेत.त्याचा अर्थ प्रत्यक्षात ज्याला समजला त्याला परमार्थ करण्याची आवश्यकता नाही.

कारण परमार्थ हा दिसण्यासाठी नाही तर आपण स्वतः परमारर्थिक असलं पाहिजे मग दिसण्याची आवश्यकता भासणार नाही. आपल्या प्रत्येकाच्या मनात इच्छा असते कि मला परमार्थ करायचा आहे. परमार्थ करायचा आहे म्हणजे नेमकं काय करायचं आहे. हेच न समजल्यामुळे आपण परमार्थ करण्या ऐवजी परमार्थिक आहेत हे दिसण्यात धन्यता मानतो. दिसण्यासाठी अहोरात्र खटाटोप करतो. दिसण हे अंतिम उपयोगी नाही तरी सुद्धा असण्या पेक्षा दिसण्या मध्येच प्रत्येकाला जास्त ऋची आहे. दिसण आणि असणं यांच्या मध्ये जमिन असमानच अंतर



आहे. तरी आपल्याला दिसायला आवडत पण कृतीमध्ये नको असत इथच आपण कमी पडतो.मी किती परमारर्थिक आहे हे दाखविण्यासाठी आपण अग्रेसर आहेत पण हिच अग्रेसरता असण्या मध्ये असली पाहिजे आणि मुळात आपण इथंच कमी पडतो याचा अर्थ परमार्थ काय आहे. हाच आपल्याला आजुन तरी निटपणे समजलेला नाही.परमार्थ म्हणजे काय त्याच खरं सामर्थ्य काय हे समजलं कि आपलं जीवन लोक कल्याणासाठी समर्पित होत. सृष्टीवर आपण का जन्माला आलो हे तर कित्येक लोकांना न सुटलेले कोडे आहे . बहुतांश लोकांनी आप आपल्या सोयीनुसार अर्थ लावलेले आहेत. आपल्याला जो अर्थ समजला त्या नुसार आपण आपलं कार्य करत त्याच पद्धतीने पुढे घेऊन जाण्याचा सपाटा लावलेला असतो. हाच सपाटा म्हणजेच मुळ अर्थ समजल्या शिवाय जो तो आप आपल्या सोयीनुसार आप आपल्या पद्धतीने विषाद करत आहे. मग खरा परमार्थ मुळ परमार्थ आपल्या पासून किती कोसोदुर अंतरावर आहे हे आपल्या लक्षात कधी येईल अथवा कुणी लक्षात आणून दिल तर ते आपल्या पचेल रुचेल आणि आपण ते मान्य करू का मग परमार्थ करण्याची इच्छा मनात असणं त्यासाठी प्रयत्न करणं आणि खरया अर्थाने परमारर्थिक होण या पैकी सोपं शाश्वत आणि खरं कोणत आहे.पण खरं खोटं हे कळलं तर बरोबर उत्तर येईल अन्यथा असत्याला सत्य मानुन धावण्याचा लावलेला सपाटा अशी जगी जाऊन थांबेल की तिथून पुन्हा परत फिरण्यासाठी फार फार काही पर्याय उपलब्ध नाहीत. खरया अर्थाने आध्यत्मिक जीवन परमार्थ या बाबी समजल्या तर खूप सरळ साध्या सोप्या आहेत. परमार्थ खरा जो शाश्वत परमार्थ आहे तो करणं तर सगळ्या उत्कृष्ट आणि सोपं आहे. फक्त परमार्थ आत्मियतेने केले पाहिजे तो मनापासून असला पाहिजे. दिसण्यासाठी केला तर मग मात्र फार काही उल्लेखनीय साध्य होईल असं निश्चितच नाही.

# परस्परविरोधी व संदिग्ध मतप्रणाल्या प्रचलित !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**वेश्याभगिनी ही कलंकित समजली जात असली, तरी देखील या पेशासंबंधी परस्परविरोधी व संदिग्ध मतप्रणाल्या प्रचलित आहेत. स्त्रियांचे अपहरण करणे, कुंटणखाने चालविणे अशा कायद्याने निषिद्ध ठरविलेले असले, तरी या कायद्यांचा अंमल मर्यादित प्रमाणात आढळतो. सन १९६०नंतरच्या स्त्रीमुक्तिवादी चळवळीच्या प्रवर्तकांनी वेश्याव्यवसाय अत्यंत हीन व स्त्रियांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व व आरोग्य यांस बाधक ठरलेला धंदा असे म्हटले आहे. पितृसत्ताक विचारसरणीमुळे ही विदारक वस्तुस्थिती समाजात मान्यता पावते व केवळ कायद्याने तिचे निर्मूलन होऊ शकत नाही, या बाबीला या चळवळीच्या नेत्यांनी प्राधान्य दिले. चरितार्थासाठी तसेच अधिक धनाच्या वा मौल्यवान वस्तूंच्या मोबदल्यात प्रस्थापित झालेले दोन परक्या व्यक्तींमधील लैंगिक संबंध म्हणजे वेश्यावृत्ती वा वेश्याव्यवसाय, असे स्थूलमानाने म्हणता येईल.**

पैशाच्या आमिषाने, कमीअधिक प्रमाणात अनिर्बंधित स्वैर स्वरूपाचे कायमचे अथवा तात्पुरते लैंगिक संबंध ठेवण्याची पद्धत म्हणजे वेश्याव्यवसाय होय. वेश्याव्यवसायात मुख्यतः स्त्रिया पुरुषांसाठी देहविक्रय करतात. पण पुरुषांनी पुरुषांबरोबर सामान्यतः समलिंगी संबंधात केलेल्या वेश्याव्यवहाराची काही उदाहरणे आढळतात. स्त्रियांनी पैसे मोजून पुरुषवेश्यांकडून लैंगिक सुख घेण्याचा प्रकार अस्तित्वात असला, तरी तो अत्यल्प प्रमाणात आढळतो. वेश्याव्यवसायातील व्यक्तीची मोबदला देणाऱ्या अनेक व्यक्तींशी लैंगिक संबंध ठेवण्याची तयारी असते. पण क्वचित आपल्या ग्राहकाची निवड त्याचे वय, आरोग्य, वंश वा जात असे निकष लावून करणाऱ्या वेश्याही आढळतात.

वेश्याव्यवसाय हा जगातील सगळ्यात पुरातन व्यवसाय मानला जातो. ग्रीक व रोमन काळांतील ग्रंथांमध्ये वेश्यावृत्तीचे उल्लेख आढळतात. भारतीय समाजातही वेश्याव्यवसाय पूर्वापार चालत आलेला आहे. इतर अनेकविध कारणांप्रमाणेच काही अनिष्ट अशा धार्मिक व सामाजिक रूढी-परंपरांतूनही या व्यवसायाला चालना मिळाली. मानवसमाज जेव्हा वसाहती करून स्थिर, सामुदायिक जीवन जगू लागला, तेव्हा लैंगिक संबंधांवर अनेक प्रकारचे नीतिनियम व निर्बंध लादण्यात आले. प्रस्थापित कुटुंबसंस्था व त्यासाठी रूढ अशी विवाहसंस्था ही सामाजिक स्थैर्यासाठी आवश्यकच होती. त्यामुळे काही प्रकारचे लैंगिक संबंध हे समाजमान्य व प्रतिष्ठेसाठी अनिवार्य ठरले. त्याचबरोबर एकाच कुटुंबातील निकटवर्ती नात्यागोत्यांतील व्यक्तींना परस्परांत लैंगिक संबंध ठेवण्यापासून परावृत्त करण्यासाठी कठोर नियमने अस्तित्वात आली. उदा.आई-मुलगा, वडील-मुलगी, बहिण-भाऊ अशा निकटच्या नात्यांतील अगम्य आप्तसंभोग सर्वच समाजांत निषिद्ध मानला जातो. प्रत्येक समाजात विवाहसंस्था भक्कम राखणे, औरस संततीचे संगोपन व कुटुंबसंस्थेचे संवर्धन करणे, ही सामाजिक व्यवस्थेची अविभाज्य अंगे मानली जात. मात्र अनिर्बंध लैंगिक संबंध ठेवण्याबाबत सामाजिक नियम नेहमी संदिग्ध राहिले. विशेषतः पुरुषप्रधान सामाजिक व्यवस्थेमध्ये स्त्रीकडे उपभोगाचे साधन म्हणून पाहिले जाते. या प्रवृत्तीमधून वेश्याव्यवसाय हा प्रत्येक समाजात निर्माण झाला. वेश्यावृत्तीला एका बाजूने निषिद्ध मानले जाते व वेश्याव्यवसाय करणारी स्त्री कलंकित व हीन समजली जाते. तरीदेखील वेश्याव्यवसाय प्रत्यके समाजव्यवस्थेत, प्रत्येक काळात पाय रोवून उभा राहिलेला आढळतो.

मानवाचे लैंगिक जीवन हे साधारणतः संस्कार व रूढी यांनुसार आकारित होते. स्त्री-पुरुष संबंधांना सहज प्रवृत्तीनुसार किंवा वैयक्तिक इच्छेनुसार व्यक्त करण्याची पूर्ण मुभा प्रगत मानवी समाजांत नाही. कायद्याने व सामाजिक रूढींमुळे विवाहाखेरीज लैंगिक संबंध ठेवणे अमान्य ठरते, तरी देखील वेश्याव्यवसायाचे प्रचलन टाळता येत नाही; याला विविध कारणे संभवतात. लैंगिक संबंध केव्हाही व वेगवेगळ्या रूपांत ठेवणे फक्त मानवालाच शक्य असते. वैयक्तिक शारीरिक सुखासाठी तसेच विशिष्ट हेतू साधण्याच्या दृष्टीनेही लैंगिक संबंधांचा उपयोग होऊ शकतो. जेव्हा लैंगिक संबंध आर्थिक मोबदल्याकरिता अथवा शारीरिक गरज व प्रजनन सोडून इतर प्रकारचे हेतू साध्य करण्याकरिता ठेवले जातात, तेव्हा वेश्यावृत्तीची व वेश्याव्यवसायाची सुरुवात होते. मानवी व्यवहार हे सहज प्रवृत्तीपेक्षा बुद्धिपुरस्सरतेवर अवलंबून असल्याचा हा परिणाम आहे. विशेषतः ज्या समाजात लैंगिक संबंधांवर फारशी बंधने नाहीत, तेथे वेश्याव्यवसायाची सामाजिक प्रश्न म्हणून तीव्रता कमी असते; तसेच त्यातून निर्माण होणाऱ्या समस्याही सौम्य असतात. उदा.नेदर्सलँडमध्ये वेश्याव्यवसायाला कायद्याने संमती दिलेली आहे. तेथील वेश्यांना उत्पन्नावर कर भरावा लागतो, त्यांच्यासाठी वैद्यकीय सेवा व इतर कल्याणकारी सोयी उपलब्ध करण्यास सरकार बांधील आहे. विवाहबाह्य लैंगिक संबंध स्वखुषीने ठेवण्याच्या व्यवहाराला जरी समाजमान्यता नसली, तरी त्यात आर्थिक मोबदल्याची देवाणघेवाण नसल्याने ती वेश्यावृत्ती ठरत नाही. वेश्याव्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बहुतांश समाजामध्ये हेटाळणीचा असला, तरीदेखील एक सामाजिक वस्तुस्थिती या दृष्टीने ते मानवी व्यवहाराचे अविभाज्य अंग बनले आहे, असेही मत आढळते. मात्र व्यक्तिगत कल्याणाच्या दृष्टीने हे चुकीचे आहे. प्राचीन काळातील ग्रीक व सायप्रसमधील संस्कृतींमध्ये विवाहयोग्य स्त्रियांना हुंड्याची रक्कम जमविण्यासाठी वेश्याव्यवसाय पत्करावा लागे. बॅबिलोनियन संस्कृतीमध्ये विवाहपूर्वी मुलींना इश्तार या देवतेला अर्पण करीत व तेथील राजपुरोहिताबरोबर संबंध आल्यानंतर ती विवाहयोग्य समजली जाई. इश्तार ही सुफलतेची देवता मानली होती व तिच्या मंदिरात धार्मिक मान्यतेने वेश्याव्यवसाय चाले. प्राचीन काळात चीनमध्ये वेश्यांची वस्ती अलग व विशिष्ट ठिकाणी असे. त्यांना विवाह समारंभात विशेष महत्त्व असे व नवविवाहित दांपत्याबरोबर अनेक रखेल- काँक्यूबाइन्स पाठवल्या जात. रूढी व परंपरेमुळे ही प्रथा समाजात दृढमूल झाली. जपानी संस्कृतीमध्ये कुटुंबसंस्थेच्या संवर्धनाला अतिशय महत्त्व होते. आपल्या मातापित्याचे व भावंडांचे पालनपोषण करण्यासाठी जी स्त्री शरीरविक्रय करी, तिला जोरो असे संबोधले जाई, मात्र तिची प्रतिष्ठा कमी होत नसे. प्राचीन ग्रीक समाजात हेटीअरी-चांगल्या मैत्रिणी हा उच्चवर्गीय वेश्यांचा प्रकार होता. त्यांची राहणी विलासी असे. डिमॉस्थिनीझ- इ.स.पू. ३८४-३२२ या अथेनियन वक्त्याचे उद्गार असे होते, "हेटीअरी या आपर सुखाच्या अपेक्षेने पदरी बाळगतो, रखेल्या या आपल्या दैनंदिन व्यक्तिगत देखभालीसाठी असतात, तर पत्नी वैध संतती देण्यासाठी व इमानेइतबारे कुटुंबाचे पालनपोषण करण्यासाठी असते." रोममध्ये वेश्याव्यवसायाला प्रतिष्ठा होती, परंतु त्यांना विशिष्ट कपडे वापरावे लागत आणि केस तांबूस, पिंगट रंगात रंगवावे लागत. तसेच या भगिनींना गावातील विशिष्ट भागात वास्तव्य करावे लागे, वेश्याव्यवसायासाठी परवना घ्यावा लागे व त्यांच्या




या उत्पन्नावर कर आकारला जाई. वेश्याव्यवसायावर सामाजिक प्रतिबंध घालण्याविषयी बायबलच्या जुना करारमध्ये निर्देश आढळतात. पेगन वेश्याभगिनी ज्यू समाजाला धोकादायक असल्याची समजूत होती. ज्यू पित्यांनी आपल्या मुलींना वेश्याव्यवसायापासून परावृत्त करावे, असे निर्बंध होते. आद्य ख्रिस्ती लेखकांनी वेश्याव्यवसाय हे अनिवार्य असे दुष्कृत्य मानले. सेंट ऑगस्टीनने इ.स.३५४-४३० दरम्यान म्हटले आहे, की मानवी वासनेला वेश्याभगिनींनी वाट काढून दिली नाही, तर समाजात बलात्कारासारख्या दुर्घटना घडतील. मध्ययुगात यूरोपमध्ये सर्वच मोठ्या नगरांतून सार्वजनिक वेश्यागृहे मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. त्यांना कायद्याचे संरक्षण व आधार होता आणि वेश्याव्यवसायाला परवानाही दिला जात असे. सार्वजनिक वित्तव्यवस्थेमध्ये वेश्याव्यवसायापासूनच्या उत्पन्नाचा वाटा मोठा होता. सोळाव्या शतकात गुप्तरोगाची संसर्गजन्य साथ सर्वत्र पसरली; तेव्हा वेश्याव्यवसायावर कडक नियंत्रणे लादली गेली. सोळाव्या शतकात धर्मसुधारणा आंदोलनामुळे लैंगिक वर्तनासंबंधीचे नवे नीतिनियम प्रस्थापित झाले व त्यातूनही वेश्याव्यवसायाला पायबंद बसला. परिणामी यूरोपमधील अनेक वेश्यागृहे बंद पडली. गुप्तरोगाच्या बळींची संख्या जशी वाढत गेली, तसे या व्यवसायावरचे निर्बंध जास्तच कडक झाले. स्त्रियांच्या व मुलींच्या अनैतिक व्यापाराला आळा घालण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर कायदे करण्यात आले. दुसऱ्या महायुद्धापर्यंत यूरोप व अमेरिकेत कुंटणखाणे व वेश्यावस्ती प्रत्येक मोठ्या शहरात होती. युद्धकाळात वेश्याव्यवसायाला चालना मिळाली. मात्र युद्धोत्तर काळात बदलत्या नीतिमूल्यांमुळे तेथील समाजांतील लैंगिक निर्बंध हळूहळू सैल होत गेले आणि स्वैर, अनिर्बंध व मुक्त लैंगिक संबंधांचे प्रमाण खूपच वाढले. विवाहपूर्व तसेच विवाहबाह्य संबंध, कुमारी मातांचे वाढते प्रमाण, कुटुंबसंस्थेचे विघटन या सर्व घडामोडींमुळे वेश्यावृत्तीचे स्वरूप पालटले. उच्चवर्गीय, नोकरदार स्त्रियांमध्येही कॉलगर्ल्स म्हणून पैसे कमावण्याची प्रवृत्ती काही प्रमाणत वाढीस लागली. तसेच वेश्याव्यवसायाशी निगडित इतर अनैतिक व्यवहार व अंमली पदार्थांच्या व्यापारासारखी गुन्हेगारी कृत्ये वाढीस लागली. मद्यपानगृहाच्या माध्यमातून वेश्याभगिनी पुरवल्या जाऊ लागल्या. एड्ससारख्या भयंकर रोगाचा फैलाव झाला. पश्चिमी जगातल्या बहुतेक मोठ्या शहरांतून वेश्याव्यवसाय खपवून घेतला जात असला, तरी या व्यवसायाशी निगडित असलेल्या गुन्हेगारीवर मात्र कायद्याने कडक कारवाई केली जाते. ब्रिटिश संसदेने सन १९५९मध्ये केलेल्या कायद्यानुसार त्यांना उघडपणे खुल्या जागी गिऱ्हाईक पटवण्यावर मनाई आहे; मात्र त्यांना घरबसल्या हा व्यवसाय चालवता येतो. तथापि ज्यांना या व्यवसायातून बाहेर पडावयाचे आहे, त्यांना पुनर्वसनासंबंधी योग्य प्रशिक्षण दिले जाते. स्कँडिनेव्हियन मुख्यतः डेन्मार्क, नॉर्वे व स्वीडन देशांतले या व्यवसायावरचे निर्बंध हे मुख्यत्वे आरोग्यविषयक बाबींसंबंधी आहेत. अमेरिकेत सर्व राज्यांत कायद्याने वेश्याव्यवसाय निषिद्ध ठरविला असला, तरी देखील वेश्यावृत्तीला बांध घालणे तेथेही अशक्य ठरले आहे. वेश्याव्यवसायाचे काही सामाजिक दुष्परिणाम संभवतात. वेश्याव्यवसायाच्या आडोशाने संघटित गुन्हेगारीचे एक अधोविश्व फोफावण्याचीही शक्यता असते. महानगरांतील भरमसाट वाढत जाणारी लोकसंख्या, नोकरी धंद्यानिमित्ताने शहरांकडे धाव घेणाऱ्या बेकार व एकाकी तरुणांचे तांडे, त्यांच्या लैंगिक गरजा भागविण्यासाठी व दारिद्र्यापोटी वेश्याव्यवसाय पतकरणाऱ्या असहाय्य, अनाथ, दीनदुबळ्या तरुणींची वाढती संख्या आदी कारणांस्तव संघटित गुन्हेगारी फोफावते व अनैतिक व्यवहारांचे जाळेही पसरत जाते. वेश्यावृत्तीला संघटित स्वरूप आल्यामुळे अनेक प्रकारच्या गुन्हेगारी व्यवहारांचा तो अड्डा बनतो. अंमली पदार्थांचा व्यापार, हातभट्टीचे व मद्यपानाचे अड्डे, नृत्यशाला, मसाज पार्लर आदी व्यवहार या व्यवसायाच्या अवकाशात चालतात. सर्व पुरुषप्रधान समाज व्यवस्थांमध्ये नैतिक व सामाजिक मूल्यांबाबत दुटप्पी धोरण आढळून येते. स्त्रियांचे पावित्र्य व चारित्र्य यांसंबंधी काटेकोर नीतिनियम असले, तरी पुरुषांच्या बाबतीत मात्र नैतिक मूल्ये शिथिल होतात. या भेदभावामुळे वेश्याव्यवसाय करणारी स्त्री कलंकित ठरते आणि समाजातून बहिष्कृत होते; परंतु वेश्यांभगिनींची विक्री करणारे दलाल व कुंटणखाना चालविणारे चालक यांच्यावर मात्र सहसा कारवाई केली जात नाही. अनेक गुप्तरोगांची तसेच एड्ससारख्या जीवघेण्या रोगांची लागण- फैलाव वेश्यांमध्ये आणि त्यांच्यामार्फत समाजात होतो. वेश्यांभगिनींचे वय वाढल्यावर त्यांना विपन्नावस्था येऊन आधार उरत नाही. कलंकित व शारीरिक व्याधींनी आणि विकृतींनी पछाडलेल्या स्त्रियांचा एक वेगळाच उपवर्ग तयार होतो. एकमेकींना आधार देऊन त्या जगतात, कारण बाह्य जगाशी त्यांचा संबंध तुटून जातो. मुंबई, पुणे, कोलकाता यांसारख्या महानगरांत वेश्यावस्तीचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले आहे. अशा वस्तीमध्ये अनेक प्रकारचे अनैतिक व बेकायदेशीर व्यवहार चालतात. बँकॉकसारख्या जागतिक पर्यटनकेंद्र असलेल्या शहरामध्ये वेश्याव्यवसाय फार मोठ्या प्रमाणावर चालतो. मोठमोठ्या हॉटेलांमध्ये दलाली चालते व गिऱ्हाईकांना मुली पुरवण्याचा जोडधंदा चालतो. विकसनशील व गरीब असलेल्या देशांमधील बेकारी, दारिद्र्य व गुन्हेगारी यांचे वाढते प्रमाण, तसेच भोगवादी संस्कृती व स्त्रियांचा कनिष्ठ दर्जा हे घटक वेश्याव्यवसायाच्या वाढीला कारणीभूत ठरतात. या प्रश्नाच्या मुळाशी दारिद्र्य व शोषण आहे. जोपर्यंत मागणी तसा पुरवठा, हे तत्त्व लैंगिक संबंधांबाबत राबविले जाते तोपर्यंत या व्यवसायाला पूर्ण आळा घालणे कठीण आहे. वेश्याव्यवसायात अनेक व्यक्तींचा व संस्थात्मक रूढींचा सहभाग असतो. देहविक्रय करणाऱ्या स्त्रिया, कुंटणखाने चालविणाऱ्या कुंटिणी, दलाल इत्यादींचा मिळून एक भिन्न प्रकारचा गट तयार होतो. सर्वसाधारण समाजापासून हा समुदाय विलग्न असतो आणि उपेक्षा व शोषण यांचे लक्ष्य ठरतो, हे मात्र नक्कीच!

# पालकांनो, लेकरांना मोबाईलपासून दुर ठेवा



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**आधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने होत असलेली वाटचाल लाभधारक वाटत असली तरी करोना संकटापासून सुरू झालेला ऑनलाईनचा जमाना ज्या विळख्यात लेकरं आडकली असुन समाज व्यवस्थेला भविष्याच्या दृष्टीने फारच मोठा धोका म्हणावा लागेल.काळाची गरज म्हणुन ऑनलाईन शिक्षण आलं पण त्याला चिकटुनच लेकरं राहिली. ज्याचे परिणाम आरोग्यावर मोठ्या प्रमाणावर होताना दिसतात. शाळेत जायचं वय झाल्यानंतर लेकराची शाळा सुरू होते. पण आता खऱ्या अर्थाने पालकांनी सावध होवुन पहाटच्या शाळा मोबाईलविना घरी करण्याची गरज वाटते. ज्यांचे पालक सावधान, त्यांची लेकरं छान छान असं म्हणायला आता हरकत नाही. मोबाईल कचाट्यातून मुक्ती मिळण्यासाठी पालकांनीच दक्ष रहाण्याची गरज वाटते.**

मोबाईलच्या ठोकड्याला खेळणी समजुन पाळण्यातल्या लेकराला देखील आई जेव्हा मोबाईल हातात देते तेव्हा आपणच आपल्या लेकरांचं नुकसान किती करू लागलो ? हे न सांगणे बरे.

करोनासारख्या काळात ऑनलाईन शिक्षणाच्या नादात विद्यार्थ्यांच्या गळ्याभोवती मोबाईलचा विळखा (फास) कमी होण्यापेक्षा वाढत जाताना दिसतो. ज्याचे दुष्परिणाम आरोग्यावर आणि मानसिकतेवर मोठ्या प्रमाणावर व्हायला लागले. लेकरांवर आलेले हे फार मोठं संकट असुन ज्यातुन बाहेर पडण्यासाठी शाळा शिक्षकावर अवलंबुन रहावे असं जर पालकांना वाटत असेल तर तो चक्क मुर्खपणा आत्मघातकीपणाचा म्हणावा लागेल. एखादी सवय भारतीयांना लागल्यानंतर जंगलाला आग लागल्याप्रमाणे अंगवळणी पडते. जो काळ संपर्काचा पोस्टमेनवर होता. त्या अगोदरही प्राण्याच्या चोचीत पत्र पाठवण्याची प्रक्रिया कदाचित मैने प्यार किया चित्रपटातुन सर्वांनीच पाहिली. अनेक संकल्पांना कधीतरी गावाकडचा माणुस आला तरी माहेरच्या माणसाकडून निरोप येत असे. बाजारात कुणी भेटलं तर खुशालीचा निरोप. कोणत्या दिशेला आभाळ उठलं ? तिथपासुन हवामानाचा अंदाज अगदी मामाचं गाव, उन्हाळी सुट्या, खेळणे, बागडणे या साऱ्या रूढी परंपराच्या गोष्टी वर्तमान सामाजिक व्यवस्थेत बंद झाल्या. पुरातन काळात श्रीकृष्ण मैदानी खेळ खेळताना कबड्डी, हुतुतु, सुरपाट्या कलियुगात देखील कालांतराने सुरू होत्या. मग कुस्ती खेळ असतील, व्यायाम अगदी नदी, नाले, विहीरीत पोहणं या सर्व गोष्टी लुप्त पावल्या. जुनं ते सोनं कालपरत्वे पुन्हा परत येईल तो भाग वेगळा. पण जुना जमाना गेला आणि मोबाईल ठोकड्याचा व्हॉटसअप जमाना आला असं म्हणायला हरकत नाही. पुर्वी लोकांच्या भेटी व्हाव्यात म्हणुन घराबाहेर पडायचं, राम राम, चहा पाणी आवक जावक, संवाद या साऱ्या गोष्टी असायच्या. त्यालाही तिलांजली मिळाली असुन व्हॉटसअप गुड मॉर्निंग चित्रातुन पाठवलेला चहाचा कप दोन हात जोडलेले नमस्कार ही संस्कृती पुढे आली. एवढेच नव्हे तर लोकांच्या मनामनात रूजली असुन प्रत्येकजण ठोकड्याच्या मोहात पडून आपलं आयुष्य जणु काही ठोकडाच असं समजत जीवन जगताना दिसु लागला. अत्याधुनिक तंत्रज्ञानाची प्रगती वाईट आहे असं मत आमचं मुळीच नाही. त्याहुन अधिक मोबाईल देखील वाईट असं मत आमचं मुळीच नाही. पण या साधनाच्या आहारी पडून जो तरूणाईचा विशेषतः अविवेक हरवत जात आहे. ज्याचं व्यसन लागल्यासारखं साधनाच्या हेडीक लोक बनु लागले ज्यामुळे माणसाची माणुसकी जिवंतपणाची रहात नसुन जीव असलेली माणसं मृतात्म्यासारखी वागु लागली. असो. अनेक धोके असु शकतात. काही चांगल्याही गोष्टी असु शकतात पण सर्वात धोक्याची गोष्ट म्हणजे या ठोकड्यापासुन पोटच्या लेकराला काही दिवस मुक्त करण्याची वेळ आली.करोनासारख्या संकटात ऑनलाईन शिक्षणाची गरज पडली म्हणून प्रक्रिया पुढे आली. त्यातुन ठोकड्यावरचा अभ्यास पहाटे सुरू झाला. तो आजही तसाच आहे. त्या चक्रव्युहात लेकरं आडकुन पडली. गंमत बघा, अभ्यासासाठी पहाटे लेकराला उठवायचं आई-वडिलांचं काम असतं. पुर्वी अशाच पद्धतीने अभ्यास घरच्या शाळेत घेतले जाई. पण आता पहाटे उठून लेकरू हातात मोबाईलचं ठोकडं घेवुन बसलं की आई-वडिलांना वाटतं मोबाईलवर अभ्यास लेकरू करतंय. हा गैरसमज जन्मदात्याच्या भविष्यासाठी देखील धोक्याचा असुन लेकरांच्या भविष्यासाठी चांगला नाही. पहाटे पुस्तक स्मरण करून वाचणं किंवा लिखाण करणं या गोष्टी पुनर्जिवीत व्हायला हव्या. किमान पहाटे पाच ते शाळेतुन लेकरं परत येईपर्यंत नाही म्हटलं तरी इयत्ता 7वी पर्यंतच्या मुलांच्या हातात मोबाईल देता कामा नये. अंधारात मोबाईलचा उजेड धोक्याचा मानसिक ताण वाढले, डोळ्यावर परिणाम होवु लागले. सहज उदाहरण म्हणून बघा एखादा मुलगा कानात हेडफोन ऐकून अभ्यास करत असेल (असं समजु.) पण तो त्या नादात एवढा असतो घरात चोरी झालेली देखील लेकराला कळत नाही. पहाटे उठून मैदानावर कुणी जाईना. कदाचित लेकरं गेले तर मोबाईलचे गाणे लावत बसतात. सुर्यनमस्कार, बैठका या गोष्टी बाजुला राहिल्या. आईनं जेवणाचं ताट समोर आणलं तरी अर्धा अर्धा तास मोबाईलमधील डोकं बाजुला निघत नाही. हा खरा समाज व्यवस्थेला उद्याच्या फार मोठा धोका म्हणावा लागेल. अतिवापरामुळे काय परिणाम भोगावे लागतात ? हे प्रत्येक घराघरात आई-वडिलांना माहितीय. जास्त खोल जाण्यापेक्षा पालकांनीच आता आपल्या जन्मदात्या मुलांच्या शाळा घरामध्ये चालु करण्याची गरज वाटते. पहाटे उठावं, संध्या, स्नान व्यायाम, पुजा, विधी, वाचन, लिखाण या गोष्टी मुलांकडून करून घेण्याची गरज निश्चित आहे. शाळेतलं शिक्षण शाळेत होईल पण जर पालक सावध झाले तरच आपले लेकरं आणि भविष्य सुरक्षित राहिल हे मात्र नक्की. किमान पहाटपासून तरी लेकरांच्या हाती मोबाईल न देता त्याच्याकडून उल्लेख केल्याप्रमाणे ज्ञानार्जन घडवून आणणे महत्वाचे वाटते. ठोकड्याच्या नादात अनेक कुटुंबात मातृ देवता देखील लेकरांकडे दुर्लक्ष करताना दिसतात. टिव्हीच्या मालिका आणि मोबाईलवर व्हॉटस अप चॅटींग या प्रेमात माता भगिनी पडल्यामुळे ज्या पद्धतीने लेकराकडं लक्ष द्यायला हवं तिथं लक्ष जाईनाच. मुलगा जर शाळातुन आला तर पुर्वी आज गुरूजींनं काय शिकवलं ? एवढं आई विचारायची. आजच्या परिस्थितीत टिव्हीच्या मालिका आणि हातातलं ठोकडं हे सोडून आईला देखील लेकरू शाळेतुन कधी आलं ? त्याने स्वच्छता केली का नाही ? जेवणं केलं का नाही ? शाळेत काय ज्ञानार्जन केलं ? हे विचारायला वेळच मिळत नाही. या चक्रव्युहात केवळ मुलं मुलीच आडकल्या असं नव्हे तर दस्तुरखुद्द आई-वडिल देखील आडकले असुन ज्याचे अत्यंत धोके समाज व्यवस्थेला होवु लागले. खरं म्हणजे सरकारने आता कायद्यानेच मोबाईल वापरावं योग्य वयानुसार बंदी आणण्याची गरज वाटते. पण काही गोष्टी जेव्हा माता-पित्यांच्या हातात असतात तेव्हा कायद्याची वाट न पहाता आपणच आपल्या घरामध्ये सावध रहाताना लेकरांना मोबाईल कचाट्यातुन मुक्त करणे काळाची गरज वाटते. ऑनलाईन जमान्यात सारंच ऑनलाईन घडत असेल तर मग लाईन जुळेल पण आयुष्य टिकणारं कधीच नसेल हे त्रिवादी सत्य म्हणुन पालकांनो, सावध व्हा, आत्मपरीक्षण करा आणि पहाटची शाळा घरी चालु करताना त्या ठोकड्यापासुन लेकराला बाजुला करत दिवा बत्तीसमोर ज्ञान प्राप्ती करून द्या आणि ज्यांनी हे सारं हाती घेतलं त्या माय-बापाच्या संसार जीवनाचं सार्थक निश्चित होईल यात शंका नाही.

# वीज चोरी प्रकरणी दाखल गुन्ह्याला राजकीय वास ?

## आजारी प्रशांत गडाख आरोपीच्या पिंजऱ्यात : कुटील राजकीय खेळ्यांनी तालुका हादरला

आधुनिक केसरी न्यूज

**घोडेगाव :** सुमारे दहा वर्षे जुन्या प्रकरणी प्रशांत गडाख संचालक असलेल्या नेवासा तालुका दूध संघावर वीज चोरीचा नाट्यमयरित्या गुन्हा दाखल झाल्याने तालुक्यात मोठी खळबळ उडाली असून त्यामागील घटनाक्रम लक्षात घेता याला राजकीय सूडचक्राचा वास असल्याचे मत राजकीय जाणकारांनी व्यक्त केले आहे. दरम्यान, कोरोना बाधीत झाल्यानंतर त्यातून अद्यापही बाहेर न पडलेल्या व गेल्या सुमारे दीड वर्षांपासून मृत्यूशी झुंज देत असलेल्या प्रशांत गडाख यांच्यावर फक्त ते माजी मंत्री तसेच आमदार शंकरराव गडाख यांचे भाऊ असल्याच्या राजकीय आकसातून तथाकथित गुन्ह्यात गोवण्यात आल्याची चर्चा जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात झडू लागली आहे.

2008 ते 2014 या कालावधीत वीज चोरी केल्याप्रकरणी नेवासा तालुका दूध संघाच्या 16 संचालकांवर अत्यंत नाट्यमय घडामोडींनंतर सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. माजी मंत्री व आमदार शंकरराव गडाख यांचे कनिष्ठ बंधु प्रशांत गडाख या दूध संघाचे संचालक असल्याने तालुका, जिल्हा तसेच राज्य पातळीवरील राजकीय कुरघोड्यांची किनार या प्रकरणाला लागल्याचे दिसून आले आहे . आमदार गडाख यांना राजकीय दृष्ट्या पेचात पकडण्यासाठी गेल्या काही वर्षांत तालुक्यातील राजकारणाच्या घसरलेल्या पातळीमुळे जिल्हाभरातील राजकीय धुरीणांनी तोंडात बोटे घातली आहेत. आमदार गडाख यांना अडचणीत आणण्यासाठी दोन वर्षांपासून आजारी अवस्थेतील त्यांच्या भावाला तथाकथित वीज चोरीच्या गुन्ह्यात गोवण्याचा प्रताप महावितरण अधिकाऱ्यांच्या माध्यमातून करण्यात आल्याचा गंभीर आरोप होऊ लागला आहे. या राजकीय सुडचक्रात गडाख यांच्या व्यतिरिक्त असलेले अन्य 15 संचालकांनाही नाहक भरडण्यात येत असल्याचे बोलले जात आहे.

**व्यक्तिगत जीवनाला धोका**

नेवासा तालुक्यात विरोधकांकडून अत्यंत खालच्या पातळीवर राजकारण केले जात आहे . आपले राजकीय तसेच वैयक्तिक जीवन उध्वस्थ करण्यासाठी असंख्य कुभांडे रचण्यात आली . दहा वर्षांपूर्वीच्या कारणाने आताशी गुन्हा दाखल होत आहे, यातच सर्व काही आले . परंतु न्याय देवतेवर आपला पूर्ण विश्वास असून लवकरच मोठा मेळावा घेऊन सर्व वस्तुस्थिती जनता जनार्दनासमोर मांडणार आहे .

**आ . शंकरराव गडाख पाटील**

काल मध्यरात्री गुन्हा दाखल करण्याचा अट्टहास कुणाच्या इशाऱ्यावरून करण्यात आला कोण यामागे यंत्रणा उभी करते हा देखील एक प्रश्न यानिमित्ताने सर्वत्र चर्चिला जात आहे .



देश, राज्य पाठोपाठ तालुका पातळीवरील राजकारणाची पातळी प्रचंड खालावली आहे. तालुक्यात गडाख यांच्या विरोधात माजी आमदार संभाजीराव फाटके, दादापाटील शेळके, तुकाराम गडाख, शिवाजीराव कर्डीले आदींनी राजकारण केले. प्रचंड राजकीय चढउतार तालुक्याने अनुभवले, तसेच पराकोटीचा राजकीय संघर्षही झाला. परंतु सर्वांनी विशिष्ट मर्यादेतच राजकारण खेळले. 2014 नंतरच तालुक्यातील राजकीय पातळी घसरल्याचे दिसून येते. वस्तुस्थितीनिष्ठ राजकारणावर वाऱ्यावरच्या वरातीने प्रभुत्व केल्यानंतर गडाख यांचे राजकीय अस्तित्व संपविण्यासाठी त्यांच्या अधिपत्याखालील मुळा कारखाना, मुळा बँक, मुळा बाजार, शिक्षण संस्था कुटील कटकारस्थानांतून नियोजनबद्धरित्या लक्ष्य करण्यात आल्याचे लपून राहिलेले नाही.

10 वर्षे जुन्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यास हिच वेळ का निवडली ?, यापूर्वीच कारवाई का नाही केली ?, विद्युत कायद्यानुसार वीज चोरीच्या गुन्ह्यात केवळ दोन वर्षे मागे जाता येत असल्याबरोबरच दीड पट आकाराच्या वर दंड आकारता येत नसताना या प्रकरणात तब्बल दहा वर्षे मागे जाण्यासह दुप्पटीच्या वरती दंड आकारणी झाल्याकडे तज्ज्ञांनी लक्ष वेधले असून आमदार गडाख यांना लक्ष्य करण्यासाठी राजकीय हेतूने प्रेरित असा घटनाक्रम निदर्शनास आला आहे. अपक्ष आमदार असल्याने सत्तासंघर्षात विद्यमान सरकार सोबत जाणे शक्य असतानाही आमदार गडाख यांनी तसे न करता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबत राहण्याचा निर्धार अवघ्या चार दिवसांपूर्वी केला होता. त्यांची भुमिका जाहीर होताच महावितरणच्या मुंबईतील अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली, हे विशेषच.


# परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांवर घाला

## गॅस टँकरच्या धडकेत दोघांचा जागीच मुत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** सिन्नर येथील सिन्नर -घोटी महामार्गावर असलेल्या आगासखिंड शिवारात गॅंस टँकरने धडक दिल्याने दहावीच्या परीक्षेला जाणाऱ्या दोन विद्यार्थ्यांचा जागीच मुत्यू झाल्याची घटना आज दि.२ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजेच्या सुमारास घडली. या घटनेने संपूर्ण तालुक्यांसह नाशिक जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. याबाबत आधिक माहिती अशी की, दर्शन शांताराम आरोटे व शुभम रामनाथ बरकले रा. दोघेही आगासखिंड असे मुत्यू विद्यार्थ्यांचे नाव आहे. दहावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात झाली असून आज दि.२ मार्च रोजी पहिलांच





मराठी विषयांचा पेपर होता. यासाठी दर्शन व शुभम हे आगासखिंड येथील माध्यमिक विद्यालयात शिकत असुन परिक्षेसाठी सकाळी ९ वाजेच्या सुमारास आपल्या स्कुटी क्र.एम.एच.१५ जी.एन २४०५ ने पांढुर्ली येथील परीक्षा केंद्राकडे जाण्यासाठी निघाले होते. त्यानंतर दर्शन व शुभमने आगासखिंड गावाजवळ महामार्गालगत असणाऱ्या डी.एड. महाविद्यालयाच्या गेटवर असलेल्या श्री स्वामी समर्थाच्या मंदिरात जाऊन देवदर्शन घेऊन ते स्कुटीवरून निघाले असता समोरून येणाऱ्या एच.पी.गॅंसच्या टँकरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेनंतर दोघेही दुरवर फेकले गेल्याने त्यांना जबर मार लागला. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव झाला. यावेळी परिसरातील नागरिकांनी तात्काळ धाव घेत दोघांना उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले. मात्र उपचारांआधीच त्यांचा मुत्यू झाला. दरम्यान, या घटनेनंतर सिन्नर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा करत टँकर व चालकाला ताब्यात घेतले असुन अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दर्शन व शुभमच्या मुत्यूने आगासखिंड ,पांढुर्ली व परिसरांवर शोककळा पसरली आहे.



# बाजारसावंगी केंद्र क्रमांक 1415 वर 14 परीक्षा दालनातून 338 विद्यार्थ्यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** परिसरात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे गुरुवारी या भागातील सात शाळातील बाजार सावंगी ताजनापुर अशा दोन परीक्षा केंद्रांवर 511 विद्यार्थ्यांनी दहावीचा मराठी भाषेचा पेपर शांततेत व सुरळीत सोडविला. बाजार सावंगी केंद्र क्रमांक 1415 वर 14 परीक्षा दालनातून 338 विद्यार्थ्यांची उपस्थिती तर एकाची अनुपस्थिती होती. केंद्र संचालक हरिभाऊ दहिफळे हे होते बैठे पथकात पंचायत समिती वित्त विभागाचे आय एन सुरडकर बीटी चव्हाण श्रीमती पेहरकर यांचा समावेश होता. या केंद्रावर साई पब्लिक इंग्लिश स्कूल स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल कैलास विद्यालय बोडखा येथील विद्यार्थी परीक्षेचे एकूण 16 पर्यवेक्षकांनी काम पाहिले लिपिक म्हणून आर. एन. सुरडकर हे होते. येथील केंद्रावर दहावीची परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात व्हावी म्हणून 25 फेब्रुवारी रोजी येथील मुख्याध्यापकांनी परीक्षेचे हॉल तिकीट वाटप करताना सर्व पालकांना निमंत्रित करून विद्यार्थ्यांनी पालकांच्या पायावर नतमस्तक होत मी कॉपी करणार नाही, अशी शपथ सर्वांसमक्ष घेतली होती. त्यामुळे मोठा हातभार लागला. शांताबाई माध्यमिक उच्च माध्यमिक शाळा ताजनापुर ( ताः खुलताबाद ) या परीक्षा केंद्र क्रमांक 1419 वर आठ परीक्षा दालनातून 173 विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली बारा विद्यार्थी अनुपस्थितीत होते. केंद्र संचालक पी. आर. वेताळ सहसंचालक गणेश काळे यांचे सह नऊ पर्यवेक्षक होते येथे महाराजा सयाजीराव हायस्कूल दरेगाव पद्मावती विद्यालय शेलगाव इंग्रजी स्कूल स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल या शाळांचा समावेश होता. केंद्रावर पोलिस बंदोबस्तासाठी येथील मुख्य जमादार नवनाथ कोल्हे सह जमादार प्रकाश ठोकळ संतोष भालेराव संतोष पुंड यांनी काम पाहिले.

# सिन्नर येथील सहकार सहाय्यक निबंधक पाटील यांना लाचलुचपतकडून अटक

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथील सहकार विभागाचे सहाय्यक निबंधक एकनाथ पाटील यांना आज दि.२ दुपारी १.३० च्या सुमारास त्यांच्या कार्यालयात १५५०० रु.ची. लाच घेतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

सिन्नर तालुक्यातील पाथरे येथील एक पतसंस्था सेवकाने कर्जदारांचे वसुली दाखले मिळावे यासाठी अर्ज केला होता. याकामी पाटील यांनी त्यांच्याकडे १७ प्रकरणांचे २ हजार प्रमाणे ३४ हजार रुपयांची लाच मागितली होती. त्यात तडजोड होऊन १५५०० वर व्यवहार ठरला. त्यानुसार मागील महिन्यात १० हजार दिले होते. मात्र दाखले तयार होऊनही उर्वरित रकमेसाठी पाटील सही करण्यास तयार नव्हते त्यामुळे वैतागून संबंधित सेवकाने नाशिक एसीबी कडे बुधवार दि. १ मार्च रोजी तक्रार केली होती. लाचलुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार सेवकाने पाटील यांची भेट घेऊन संबंधित रक्कम देण्याचे मान्य केले त्यानुसार आज दि.२ मार्च दुपारी १.३० वाजेच्या सुमारास सरकारी पंचांसमोरच पाटील यांनी १५५०० रु.ची.लाच स्वीकारली.

यावेळी लपून बसलेल्या एसीबी अधिकाऱ्यांनी लाच स्वीकारलेल्या रकमेसह पाटील यांना अटक केली. उपविभागीय अधिकारी अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक संदीप साळुंखे, हवालदार सुखदेव मुरकुटे, पंकज पळशीकर, मनोज पाटील यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# किडनी दिनानिमित्ताने फिटनेस फेस्ट; योगा, मानसिक आरोग्यावर मार्गदर्शन

## किडनी पेशंट धावणार आणि करणार सायकलिंगही

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सायक्लोथॉन, धावण्याची स्पर्धा, विविध खेळ , योगा आणि मानसिक आरोग्य अशा भरगच्च उपक्रमांचे आयोजन जागतिक मूत्रपिंड दिनाच्या निमित्ताने आयोजित फिटनेस पेस्ट मध्ये करण्यात आले आहे. मूत्रपिंड प्रत्यारोपणानंतरही सर्वसामान्यांप्रमाणे आयुष्य जगता येते तथापी मूत्रपिंडाचे आजार उद्‌भवूच नयेत यासाठी जिवनशैली कशी असावी यावर जनजागृती करण्याचा जागतिक मूत्रपिंड दिन साजरा करण्यामागचा उद्देश असल्याचे सुमन किडनी फाऊंडेशनचे डॉ. सुहास बावीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. ९ मार्च हा जागतिक मूत्रपिंड दिनाच्या निमित्ताने ५ मार्च रोजी भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन सुमन किडनी फाऊंडेशन, उत्कर्ष हॉस्पिटल, एमआयटी हॉस्पिटल आणि रिसर्च इन्स्टिट्यूट , जेआयआययू चे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेडीकल सायन्स ॲण्ड रिसर्च आणि निझॉन ट्रेनिंग सिस्टीम यांच्यावतीने करण्यात आले आहे. ५ मार्च रोजी समता दर्शन हॉल येथे सकाळी १० वाजता वेंद्रिय मंत्री डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन होईल तर बदनापूर वैद्यकीय महाविद्यालयाचे अध्यक्ष मौलाना हुजेफा वस्तान्वी, डीन अझहर अहमद सिध्दीकी प्रमुख पाहुणे असतील एमआयटीचे अध्यक्ष मुनिष शर्मा अध्यक्षस्थानी असणार आहेत. डायलिसीसवर असलेले आणि मूत्रपिंडप्रत्यारोपण रुग्णांसाठी डॉ. विजय व्यवहारे यांच्या नेतृत्वाखाली दोन, पाच आणि दहा किलोमिटर सायक्लोथॉन होणार आहे यावेळी निरोगी किडनीचा नारा देण्यात येणार आहे. किडनी दाते आणि रुग्णांसाठी शंभर मिटर धावण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. डॉ. गायत्री कुलकर्णी योगाचे सत्र घेतील तर मूत्रपिंडरोग तज्ज्ञ डॉ. पुर्वा बाविकर मूत्रपिंड आणि आरोग्य यावर मार्गदर्शन करतील. अंकिता धाग आरोग्य आणि आहार विषयावर तर डॉ.निखिल खेडकर मानसिक आरोग्यावर मार्गदर्शन करणार आहेत. ४ मार्च रोजी निरोगी किडनी आणि निरोगी हृदय हा उद्देश केंद्रस्थानी ठेऊन कार्यशाळा होणार आहे. हॉटेल मधुबन, बीड बायपास येथे होणाऱ्या कार्यशाळेचे उद्‌घाटन मुख्य वैद्यकीय प्रशासकीय अधिकारी डॉ.संतोष ढाकणे यांच्या भाषणाने होईल. औरंगाबाद फिजीशियन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय पटणे निरोगी जिवनासाठी डॉक्टरांनी करावयाची जनजागृती, योग्य दिशा आणि आवश्यक तेथे उपचार कसे करावेत यावर मार्गदर्शन करतील. डॉ. पुर्वा बावीकर निरोगी किडनीसाठी आहार आणि व्यायामाचे महत्व यासंदर्भात विवेचन करणार आहेत. खेळाडूंच्या फिटनेस संदर्भात इंग्लंडमध्ये अभ्यास करुन आलेले गौरव निझौन टेनिस खेळाडूच्या फिटनेस संदर्भात मार्गदर्शन करतील. ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ डॉ. श्रीकांत धनवले व्यायामाव्दारे हृदयाचे आरोग्य राखणे या विषयावर तर ज्येष्ठ मूत्रपिंडविकारतज्ज्ञ डॉ. सुहास बावीकर किडनीविकारात रोगप्रतिकारक शक्ती चाचण्यांचे महत्व या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. जास्तीत जास्त डॉक्टरांनी कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आवाहन एमआयटी हॉस्पिटलचे संचालक डॉ.सुनिल देशपांडे , मुख्य वैद्यकीय कार्यकारी अधिकारी डॉ. संतोष ढाकणे आणि सुमन किडनी फाऊंडेशनचे डॉ. सुहास बावीकर यांनी केले आहे.



महागाईच्या व गॅस दरवाढीच्या विरोधात आंदोलना बाबतकेंद्र सरकारने वेळोवेळी सर्व सामान्यांना चटका लागेल असे गॅस दरवाढ, इंधन दरवाढ केली आहे. या दरवाढी विरोधात छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटी वतीने गुरुवारी ११.३० वाजता क्रांतीचौक येथे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात चुलीवर स्वयंपाक करण्यात आला. यावेळी डॉ.कल्याण काळे, शेख युसुफ आदींसह शेकडो महिला व कार्यकर्ते उपस्थित होते.

# दिंडोरी पेठ मतदारसंघातील मंजूर विकासकामे वेळेत पूर्ण करा

## विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** दिंडोरी पेठ मतदारसंघात विविध रस्त्यांची नूतनीकरण मजबुतीकरण कामे मंजूर असून सदर कामांची गुणवत्ता राखत लवकरात लवकर दर्जात्मक कामे पूर्ण करून घेण्यासाठी बांधकाम विभागाने दक्षता घ्यावी असे आवाहन करतानाच कुठेही कामातील हलगर्जीपणा खपवून घेतले जाणार नाही असा इशारा विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी दिला. दिंडोरी येथे शासकीय विश्रामगृहावर विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी दिंडोरी व पेठ तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा परिषद इमारत व दळणवळण बांधकाम विभाग यांच्या अभियंता शाखा अभियंता यांचेसमवेत विविध मंजूर असलेल्या तसेच नियोजित कामांचा आढावा घेतला त्यावेळी झिरवाळ बोलत होते. यावेळी बोलताना नरहरी झिरवाळ यांनी दिंडोरी पेठ मतदारसंघातील विविध विकासकामांसाठी कोट्यवधींचे कामे मंजूर आहे त्यात रस्त्यांची दुरवस्था बघता बहुतांशी रस्त्यांचे कामांना मंजुरी मिळाली असून त्यातील काही कामे झाली आहे काही सुरू आहेत तर काही लवकरच सुरू होणार आहे. मात्र सदर रस्त्यांचे गुणवत्तेबाबत नागरिकांची तक्रार असून सदर कामाची गुणवत्ता राखण्याचे, ठेकेदारांकडून निविदेनुसार काम करून घेण्याची जबाबदारी ही बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची असून त्यांनी ती जबाबदारी पूर्ण करत काम चांगले करून घ्यावे अन्यथा त्याची जबाबदारी आपली राहील असे सांगितले तसेच अनेक कामे संथ गतीने सुरू आहे त्यांना गती द्यावी लवकरात लवकर कामे पूर्ण करावी . काही रस्त्यांची कामे प्रस्तावित आहेत ते ही लवकरच मंजूर होतील ती ही कामे त्वरित सुरू कसे होतील यांचे नियोजन करत टेंडर प्रक्रिया लवकर राबवावी.प्रशासकीय दिरंगाई मुळे कोणताही निधी परत जाता कामा नये अन्यथा कुणाचीही गय केली जाणार नाही असे ही झिरवाळ यांनी सांगितले.तसेच तालुक्यातील रस्त्यांवर औद्योगिक कंपन्या ची जडवाहतुक यामुळे रस्ते लवकर खराब होत आहे तरी सदर रस्त्यांची दर्जा उन्नती व्हावी यासाठी अधिकाऱ्यांनी वस्तुनिष्ठ अहवाल तयार करून शासनाला पाठवावा असे सांगितले. यावेळी प्रांताधिकारी ,दिंडोरी तहसीलदार,पेठ तहसीलदार,गटविकास अधिकारी,बांधकाम विभाग



**जिल्हा परिषद अंतर्गत 33 कोटींचे विकास कामांना मंजुरी :** जिल्हा परिषद अंतर्गत येणारे रस्त्यांचे कामासाठी सुमारे 33 कोटींचा निधी मंजूर झाला आहे मागे एक अधिकाऱ्यांच्या बेपरवाही मुळे निधी परत गेला होता आता पुन्हा तसा प्रकार होणार नाही याची दक्षता अधिकाऱ्यांनी घेवून त्वरित प्रशासकीय कारवाई पूर्ण करत कामे सुरू करावी व कामांचा दर्जा राखावा असे विधानसभा उपाध्यक्ष झिरवाळ यांनी सांगितले .

**नागरिकांनी दक्ष राहत सहकार्य करावे :** आपल्या परिसरात होणाऱ्या रस्त्यांचे काम योग्य पद्धतीने होते की नाही याबाबत नागरिकांनी दक्ष राहावे खराब काम अजिबात खपवून घेवू नका तसेच रस्त्याचे काम होत असताना डांबरीकरण होत असताना पर्यायी रस्त्यांचा वापर करावा कुणीही नवीन तयार झालेल्या रस्त्यांवर त्वरित गाड्या घालू नका .पर्यायी रस्त्यांचा वापर करत सहकार्य करा .

कार्यकारी अभियंता गांगुर्डे आदींसह बांधकाम विभाग जिप पस चे अधिकारी उपस्थित होते.ज्येष्ठ नेते विश्वासराव देशमुख, जि प सदस्य भास्कर भगरे, माजी उपनगराध्यक्ष कैलास मवाळ,भाऊसाहेब पाटील, डॉ. योगेश गोसावी, कचरू पाटील आदींनी विविध सूचना मांडल्या.

# विनचेस्टर इंटरनॅशनल इंग्लिश स्कुलमध्ये मराठी भाषा गौरव दिन



आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील विनचेस्टर इंटरनॅशनल स्कूलमध्ये मराठी भाषा दिन गौरव उत्साह साजरा करण्यात आला यामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी अनेक प्रकारचे वेग वेगळे लावण्या, नाटक, नृत्य, सादर केले. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ कवी लेखक, समीक्षक, कादंबरीकार, नाटककार विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्मदिवस हा मराठी भाषा गौळण म्हणून साजरा करण्यात येतो 'मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात येतो. प्रशालेचे संस्थापक / मुख्याध्यापक डॉ. अफसर खान यांनी सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष पद भूषविले.

मराठी भाषेचे महत्व व ज्येष्ठ कवी कथाकार, कादंबरीकार, नाटककार विष्णू वामन शिरवाडकर यांच्या कार्यक्रमाचे वर्णन भाषणाच्या माध्यमातून हाफसा खान, जैद पटेल, मनाली गंगावणे या विद्यार्थ्यांनी केले. तसेच कवी कुसुमाग्रज यांच्या काही सुंदर कवितेचे सादरीकरण अदिती वेलदोडे, कुलुसूम कादरी, शेख आमर यांनी केले. इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनींनी मराठी गीतावर नृत्य सादर केले. प्रशालेच्या सहशिक्षिका सारिका पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. संस्थापक / मुख्याध्यापक डॉ. अफसर खान ज्ञानपीठ पुरस्कार विजेते विष्णू वामन शिरवाडकर यांच्या अमोध कार्याचे वर्णन केले. याप्रसंगी प्रशालेचे पर्यवेक्षक शगुफ्ता खान, माया सुरडकर, बरीन लेईक यांची उपस्थिती होती. सहशिक्षिका शितल राठोड यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाचा समारोप केला.

# नांदेड-कुर्ला एक्स्प्रेसच्या बोगींखालून धूर

आधुनिक केसरी न्यूज



**निफाड :** नांदेड-कुर्ला हॉलिडे एक्स्प्रेस या धावत्या गाडीच्या दोन बोग्यांखालून अचानक मोठ्या प्रमाणावर धूर निघू लागल्यामुळे प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली. गुरूवारी सकाळी सव्वा नऊ वाजेच्या सुमारास निफाड तालुक्यातील उगाव रेल्वे स्थानकात ही गाडी साखळी ओढून थांबविण्यात आली. त्यानंतर रेल्वे कर्मचारी व जागृत प्रवाशांनी अग्निप्रतिरोधक यंत्रणा कार्यान्वित केली. तब्बल ३५ मिनिटानंतर ही गाडी नाशिककडे मार्गस्थ झाली. दरम्यान गाडीतून धूर निघू लागल्यावर दोन ते तीन प्रवाशांनी धावत्या रेल्वेतून उड्या घेतल्याचे सांगितले जाते.

गुरुवारी सकाळी नऊच्या सुमारास नांदेड-कुर्ला हॉलिडे स्पेशल ही गाडी नाशिकसाठी मार्गस्थ झाली. लासलगाव रेल्वे स्थानकातून ही गाडी निघाल्यानंतर या गाडीच्या इंजिनपासून पाचव्या आणि सहाव्या बोगीखालून ( एस तीन आणि एस चार ) मोठ्या प्रमाणावर धूर निघू लागला. सुरुवातीला डिझेल इंजिनचा धूर असावा असे वाटल्याने प्रवाशांनी दुर्लक्ष केले. पण नंतर धुळीचे लोळ उठू लागले. त्यानंतर बोगीखालून घालून मोठ्या प्रमाणावर धूर निघत असल्याचे स्पष्ट झाल्यावर प्रवाशांनी तात्काळ गाडीची साखळी ओढली. एव्हाना गाडी उगाव रेल्वे स्थानकाजवळ पोचली होती. चालकाला इशारा मिळाल्यानंतर त्याने उगाव रेल्वे स्थानकात गाडी थांबवली. घाबरलेल्या प्रवाशांनी या दोन्ही बोगीतून पटापट खाली उतरण्याचा निर्णय घेतला. जवळपास पाच ते सहा बोग्यांमधील प्रवाशांत घबराट पसरली. रेल्वे प्रवासी आणि जागृत नागरिकांनी तात्काळ या दोन्ही बोगींचा ताबा घेतला आणि खालील बाजूने अग्निप्रतिरोधक यंत्रणा कार्यान्वित केली. अग्निरोधक पावडर सोडण्यात आली. त्यानंतर हा धूर आटोक्यात आला. बोगीच्या खाली असलेल्या लायनिंग वायर सर्किटच्या घर्षणामुळे हा धूर निघाल्याचे सांगण्यात येते. ३५ मिनिटानंतर हा धूर निघणे थांबले आणि गाडी नाशिककडे रवाना झाली.

# कसबा पेठेतील जनतेने भाजपाला धडा शिकवला

## नाना पटोले : भाजपाच्या सत्ता, पैसा व दहशतीला कसब्याच्या जनतेने चोख उत्तर दिले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कसबा पेठ या भाजपाच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावत महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांनी दणदणीत विजय मिळवला आहे. गेली २८ वर्ष या मतदारसंघातून भाजपा उमेदवार निवडून येत असे पण यावेळी कसबा पेठच्या जनतेने भाजपाचा डाव उधळून लावला. पुणे हे शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी विचाराचे शहर असून माजी राज्यपाल व भाजपाने सातत्याने या विचाराचा अपमान करण्याचे पाप केले, जनतेला हे आवडले नाही म्हणून जनतेने मतपेटीतून भाजपाला जागा दाखवून दिली आहे, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.

कसबा पेठ पोटनिवडणुकीत मविआचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांच्या विजयाचा जल्लोष काँग्रेस मुख्यालय टिळक भवन येथे ढोल ताशांच्या गजरात मिठाई वाटून, फटाके फोडून साजरा करण्यात आला. यावेळी प्रदेश कार्याध्यक्ष माजी मंत्री नसीम खान, आमदार विकास ठाकरे, आ. वजाहत मिर्झा, प्रदेश उपाध्यक्षा चारुलता टोकस, प्रदेश सरचिटणीस प्रमोद मोरे, उत्कर्षा रुपवते, प्रवक्त्या भावना जैन, प्रदेश सचिव राजाराम देशमुख, झिशान अहमद, अर्चना राठोड, ज्येष्ठ नेते दत्ता नांदे, अशोक आमानकर यांच्यासह काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, कसबा पेठ पोटनिवडणुकीत सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने पैशाचा वारेमाप वापर करत मते विकत घेण्याचा प्रयत्न केला. पण जनतेने भाजपाला त्यांची जागा दाखवून दिली. पैशाच्या जीवावर राजकारण करणाऱ्या भाजपाला जनतेने चोख उत्तर दिले आहे. कसब्याच्या जनतेला भारतीय जनता पक्षाने गृहीत धरले होते पण भाजपाची खरी संस्कृती काय आहे हे या पोटनिवडणुकीत कसबा व महाराष्ट्राच्या जनतेने पाहिले आहे. मंत्री व पोलिसांच्या मदतीने पैसे वाटप करण्यात आल्याचे प्रकार घडले, तडीपार गुंड मंत्र्यांसोबत फिरतानाही लोकांनी पाहिले. पैसे वाटून, दहशत निर्माण करुन निवडणूक जिंकण्याचे भाजपाचे प्रयत्न जनतेने उधळून लावले. कसबा पोटनिवडणुकीसाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्यासह डझनभर मंत्री तळ ठोकून होते. निवडणूक जिंकण्यासाठी भाजपाने सर्व प्रयत्न केले पण त्यात त्यांना यश आले नाही. महागाई, बेरोजगारीने त्रस्त जनता व छोटे व्यापारी यांनी भाजपाला धडा शिकवला आहे. सत्तेचा दुरुपयोग भाजपा कसे करतो याचे दर्शन कसबा पोटनिवडणुकीत जनतेने पाहिले. कसबा पोटनिवडणुकीचा निकाल हा भाजपाची उलटी गिनती सुरु झाल्याचे दर्शवणारा आहे. रविंद्र धंगेकरांना बहुतमाने निवडून दिले त्याबद्दल कसबा पेठ मतदार संघातील जनतेचे व काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना व महाविकास आघाडीच्या सर्व नेते, पदाधिकारी




व कार्यकर्त्यांचे नाना पटोले यांनी यावेळी आभार व्यक्त केले. तामिळनाडू व पश्चिम बंगालमधील पोटनिवडणुकीतही काँग्रेस उमेदवाराचा विजय झाला आहे. त्रिपुरामध्ये काँग्रेसचा एकही आमदार नव्हता तेथे पाच मतदारसंघात काँग्रेस उमेदवार विजयी झाले, नागालँड विधानसभेच्या निवडणुकीतही काँग्रेस पक्षाचे दोन उमेदवार निवडून आले आहेत. देशभरातील निकालात काँग्रेस पक्षाला लोकांची पसंती मिळत असल्याचे चित्र आहे, आगामी काळातील निवडणुकांमध्ये हेच चित्र कायम राहणार असून ही परिवर्तनाची सुरुवात आहे असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.



# मातृभाषेतून मूलभूत शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची अधिक चांगली प्रगती

आधुनिक केसरी न्यूज

भुसावळ : मानवी जीवनात भाषेला मध्यवर्ती स्थान आहे. प्राथमिक शिक्षणास मातृभाषेतून प्रोत्साहन देणे हे सर्व जगाला मान्य झालेले तत्त्व आहे. जगभरातील भाषा व शिक्षणतज्ज्ञांनी केलेले विविध अभ्यास असे सांगतात की, मातृभाषेतून मूलभूत शिक्षण मिळाल्यास विद्यार्थी अधिक चांगली प्रगती करू करतात, असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी किशोर वायकोळे यांनी केले. भुसावळ येथील के. नारखेडे विद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशीय संस्थेतर्फे मराठी ई-प्रश्नमंजुषेचा शुभारंभ श्री. वायकोळे यांच्या हस्ते झाला. यावेळी के. नारखेडे विद्यालयाचे प्राचार्य नितीन किरंगे, बालभारती मराठी भाषा अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. जगदीश पाटील, श्रीमती प.क. कोटेचा हायस्कूलचे शिक्षक संजीव पाटील, इब्टा संघटनेचे जिल्हाध्यक्ष आर.आर. धनगर उपस्थित होते. डॉ. जगदीश पाटील यांची निर्मिती असलेली मराठी ई-प्रश्नमंजुषा ही 25 गुणांवर आधारित असून ही प्रश्नमंजुषा सोडवल्यानंतर अचूक नोंदवलेल्या ई-मेलवर ई-प्रमाणपत्र प्राप्त होणार आहे. यासंदर्भात संजीव पाटील यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी व मराठी ज्ञानाच्या प्रचार आणि प्रसारासाठी अशा प्रकारचे उपक्रम लाभदायी ठरत असतात असे सांगितले. प्रश्नमंजुषाच्या माध्यमातून मराठीचे ज्ञान अजूनच वाढणार असल्याचे प्राचार्य नितीन किरंगे म्हणाले. ही प्रश्नमंजुषा मराठी भाषा व त्यासंदर्भातील माहिती मिळावी यासाठी उपयुक्त असल्याचे आर.आर. धनगर यांनी सांगितले. सूत्रसंचालन संजीव पाटील यांनी तर आभार डॉ. जगदीश पाटील यांनी मानले.

मराठी भाषा संदर्भातील माहिती सर्वच स्तरातील नागरिकांपर्यंत पोहोचावी या हेतूने छत्रपती शिवाजी महाराज बहुउद्देशीय संस्थेतर्फे मराठी ई-प्रश्नमंजुषा हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे . याअंतर्गत लिंकवर जाऊन प्रश्नमंजुषा सोडविल्यास नोंदविलेल्या ई-मेलवर प्रमाणपत्र मिळणार आहे . लिंक मिळवण्यासाठी 8830112641 या नंबरवरील व्हॉट्सअपवर Send Me Link असा मेसेज पाठवावा, असे आवाहन करण्यात आले आहे .

# राजेंद्र मगर यांनी वाढदिवसाचा खर्च टाळून गो शाळेला मदत

आधुनिक केसरी न्यूज

**तलवाडा :** वाढदिवस म्हटले कीबॅनर, पोस्टर लावण्याची परंपरा गेल्या काही वर्षात सर्वत्र दिसून येते, मात्र या परंपरेला फाटा देत समाजोपयोगी आणि संवर्धन व्हावे हा उद्दात हेतू समोर ठेवूनगोमातेचे संरक्षण व संगोपणाची चळवळ जनमाणसापर्यंत रुजावी या हेतूने जीवनात आपण काहीतरी समाज उपयोगी कार्य या निमित्ताने करू शकतो म्हणून वैजापुर तालुक्यातील तलवाडा येथील पंचायत समिति मा उप सभापती राजेंद्र मगर यांनी आपला वाढदिवस अगदी साध्या पद्धतीने साजरा करत कामधेनु गोशाळेत हिरव्या चाऱ्यासाठी साठी 5100 रु देऊन ऊसाचे 6000 भेळे भरलेलीएक पीक अप वाढे देत वाढदिवस साजरा केला आहे.

तरुण- युवकांनी वाढदिवसाच्या आनाठाई खर्च नकरता अशाच प्रकारचा वाढदिवस साजरा करावा.आसे आव्हान पंचायत समिती मा.उप सभापती राजेंद्र मगर केले. यावेळी आधुनिक केसरीशी बोलतांना राजेंद्र मगर म्हणाले दुग्धोत्पादनातून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविणाऱ्या परंतु तेच उत्पन्न बंद झाल्यावर सोडून दिल्या जाणाऱ्या गोमातांना आधार दिल्या जाणार्या कामधेनु गोशाळेच्या तेहतीस कोटी देवांचा वास ज्यामध्ये असतो... कुळधर्म-कुळाचाराला नैवेद्याचे वेगळे पान जिच्यासाठी वाढले जाते... वसुबारस हा स्वतंत्र दिन ज्यासाठी साजरा केला जातो... अशा गायींचा सांभाळ करून पालनपोषण करीत असलेल्या अर्जुन महाराज यांच्या कोल्ही येथील कमधेनु गोशाळेत गाय अन तिच वासरु... हे नातं आई-बाळाच्या नात्याप्रमाणेच असतं. लहानपणापासूनच बाळाला हम्बा हम्बा.. असं म्हणत गायीची ओळख करून देण्यात येते. खेडो-पाड्यात आज देखील गायी, त्यांचे गोठे पहावयास मिळताततत. मात्र, गायींचे प्रमाण कमी आहे. अध्यात्मात गायीला अनन्य साधारण महत्त्व आहे. यामुळे आजही गायींचे पूजन करण्यात येते. गायींमधील काम करण्याची क्षमता संपल्यावर तसेच गायींना व्याधी झाल्या असल्या तर अनेकांतर्फे त्यांना मोकळ्यावर सोडून देण्यात येते किंवा गो-शाळेत दान दिले जातात. अशा गायींवर उपचार करणे, त्यांचे पालनपोषण करण्यासाठी वैजापुर तालुक्यातील कोल्ही येथील गोशाळा कार्यरत आहेत.



# राज्यातून युरोपला ३८ हजार टन द्राक्षे निर्यात

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** महाराष्ट्रातून जगभरात द्राक्षांची निर्यात सुरू आहे. संपूर्ण देशातून आजवर १ लाख २५ हजार टन द्राक्षांची निर्यात झाली आहे. त्यापैकी युरोपला ३८,५५६ टन द्राक्ष निर्यात झाली आहे. द्राक्ष निर्यातीत राज्याचा वाटा जवळपास ९५ टक्क्यांपर्यंत आहे. मार्च, एप्रिल महिन्यांत वेगाने द्राक्ष निर्यात होण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

देशातून सव्वा लाख टन द्राक्षांची निर्यात झाली असून, प्रामुख्याने बांगलादेशला ३१६५९ टन, संयुक्त अरब अमिरातीला ४७२८ टन,



नेपाळला ६४१३ टन आणि रशियाला ११६८ टन द्राक्षांची निर्यात झाली आहे. युरोपला देशातून ३८.५५६ लाख टनांची निर्यात झाली आहे, त्यात राज्याचा वाटा ३८,५३१ टन इतका आहे. नेदरलँण्डला सर्वाधिक २८७२८ टन, ब्रिटनला ३४०७ टन, जर्मनीला २०१२ टन द्राक्षांची निर्यात झाली आहे.राज्यात नाशिक जिल्ह्याने निर्यातीत मोठी आघाडी घेतली आहे. नाशिकमधून ३५७९९ टन, सांगलीतून १६०२ टन, सोलापुरातून ५७१ टन, नगरमधून २०० टन, पुण्यातून १७३ टन, लातूरमधून ५० तर उस्मानाबादमधून ३२ टन द्राक्षांची निर्यात झाली आहे. राज्यातील द्राक्षांना बांगलादेशातून मोठी मागणी असते. त्यामुळे राज्यातून सुपर सोनाक्का, आनुष्का आदी वाणांच्या द्राक्षांची बांगलादेशाला निर्यात होते. यंदा बांगलादेशाने शेतीमालाच्या आयातीवर १२० टक्के आयात कर लादला आहे. त्यामुळे हजार रुपयांच्या द्राक्षाच्या क्रेटला १२०० रुपये कर भरावा लागतो आहे. याचा विपरीत परिणाम निर्यातीवर होत आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे अध्यक्ष शिवाजी पवार यांनी दिली.

# ठाण्यात शिवसेनेच्या उपविभागप्रमुखाची हत्या

## ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** बाजारपेठेतील जांभळीनाका भागात शिवसेनेचे उपविभागप्रमुख रवींद्र परदेशी (४९) यांची फेरीवाल्यांच्या जागेच्या वादातून हत्या करण्यात आल्याचा प्रकार मंगळवारी रात्री उघडकीस आला आहे. याप्रकरणी ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी ध्रुव पटवा (३३) आणि अशरफ अली (२१) या दोघांना अटक केली आहे.

जांभळीनाका ही बाजारपेठ ठाणे शहरातील मुख्य बाजारपेठ ओळखली जाते. या बाजारपेठेत शिवसेनेचे उपविभागप्रमुख रवींद्र परदेशी यांचाही व्यवसाय होता. काही दिवसांपासून त्यांच्या समोर ध्रुव आणि अशरफ यांनीही व्यवसाय थाटला होता. त्यामुळे ध्रुव आणि अशरफ यांच्याशी रवींद्र यांचे वाद सुरू होते. मंगळवारी रात्री १० वाजता रवींद्र हे परिसरातून जात असताना ध्रुव आणि अशरफ त्या ठिकाणी आले. त्यांनी हातातील चाकूने रवींद्र यांच्या डोक्यात वार केले. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले.

या घटनेची माहिती ठाणे नगर पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. रवींद्र यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु त्यांचा मृत्यू झाला होता. रवींद्र यांच्या मुलाने दिलेल्या तक्रारीच्या आधारे ठाणे नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. ध्रुव आणि अशरफ या दोघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता, त्यांनी जागेच्या वादातून रवींद्र यांची हत्या केल्याची कबुली दिली.

# तलवार घेऊन दहशत पसरवणाऱ्या सात व्यक्तींवर पोलिसांची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

कटफळ बीट येथील भागामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये अवैध दारू विक्री, वाळू तस्करी, मटका व गुटख्याची मोठ्या प्रमाणामध्ये तस्करी केली जाते अवैध धंद्याच्या माध्यमातून मिळालेल्या पैशातून या भागामध्ये अनेक गुन्हेगारीच्या घटना घडलेल्या आहेत .तसेच या भागातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे अवैद्य धंदेवाल्या बरोबर अर्थपूर्ण लागेबंध असल्यानेच पोलिसांचा गुंडा वरती वचक राहिला नसल्याचे लोकांकडून बोलले जात आहे . या भागातील अधिकाऱ्यांची त्वरित बदली करण्याची मागणी केली जात आहे .

**रवींद्र कांबळे**

**सांगोला :** गैर कायद्याची मंडळी जमवून हातात धारदार शस्त्र व दांडके दाखवून रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना आडवे होऊन धाक दाखवून दहशत पसरविणाऱ्या सात जणांच्या पोलिसांनी मुसक्या आवळून दोन तलवारीसह दांडके जप्त केले. ही कारवाई मंगळवारी दुपारी ३:३०च्या सुमारास महूद, ता. सांगोला येथील अकलूज चौकात केली. याबाबत पोलीस कॉन्स्टेबल लक्ष्मण वाघमोडे यांनी ७ जणांविरुद्ध पोलिसात फिर्याद दिली आहे.
सांगोला पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार बापूसाहेब झोळ, विकास क्षीरसागर , राजू चौगुले, पोलीस नाईक केदारनाथ भरमशेट्टी , बाबासाहेब पाटील ,पोलीस कॉन्स्टेबल लक्ष्मण वाघमोडे असे मिळून मंगळवारी दुपारी ३:३०च्या सुमारास गुप्त बातमीदाराने काही इसम महूद येथील अकलूज चौकात जवळील मशिदीच्या जवळ हातात तलवार व दांडके दाखवून रस्त्याने येणारे जणारे लोकांना रस्त्यात अडवून धाक दाखवीत आहेत. त्यामुळे त्या परिसरातील लोकांनी घर व दुकानाचे दरवाजे बंद केले असून रस्त्यावर त्यांची दहशत सुरू असल्याचे माहिती मिळाली त्याआधारे पोलिसांनी सदर ठिकाणी धाव घेतली असता दोन इसम हातात लोखंडी तलवार घेऊन व त्यांच्यासोबत इसम हातात दांडके घेऊन रस्त्यातील येण्या जाणाऱ्या लोकांना अडवून धाक दाखवीत होते यादरम्यान पोलिसांना पाहून सदर इसम पळून जाण्याच्या बेतात असताना पोलिसांनी घेरावा घालून आकाश उर्फ कांचन उर्फ कांच्या अनिल बोडरे-२२, विशाल अनिल बोडरे -२९, अमित अजय चव्हाण -१९, हणमंत भारत येडगे -२८, समीर बशीर पठाण -४१अस्लम बशीर पठाण -३२, फिरोज बशीर पठाण-३३ सर्वजण रा महूद यांना निःशस्त्र करून पकडले. आकाश उर्फ कांचन बोडरे व असलम पठाण यांनी तलवार जवळ बाळगल्याबाबत त्यास परवाना आहे का ? विचारणा केली असता त्याने नसल्याचे सांगितले पोलिसांनी पंचा समक्ष दोघांकडून तलवार जप्त करून सर्वांना ताब्यात घेऊन अटक केली. त्यांच्यावर भादंवि विविध कलमातंर्गत तसेच आर्मी ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल केला. तपास पोलीस हवालदार बापूसाहेब झोळ करीत आहे.



# विद्यार्थ्यांनी टेन्शन न घेता परीक्षेला सामोरे जावे : प्रा वाघ

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** 10वी च्या विद्यार्थ्यांचा वर्षभर पूर्ण अभ्यास झाला असून आता निसंकोच पणे पेपर द्यावे असे उदगार कोचिंग क्लासेस असोसिएशनचे राज्य अध्यक्ष प्रा. पी. एम. वाघ यांनी काढले. न्यू ST कॉलनी N2 येथील स्वामी समर्थ क्लासेस च्या 10वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ कार्यक्रमात बोलत होते. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून परिवर्तन कॉम्प्युटर्स चे संचालक कॉम्रेड मधुकर खिल्लारे, अभिनव क्लासेसचे संचालक जाधव, काजळे उपस्थित होते. याप्रसंगी कॉ. मधुकर खिल्लारे यांनी देखील विद्यार्थ्यांना विविध प्रेरणादायी उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या मागे न लागता एक चांगला नागरिक घडावा असे आपल्या भाषणात सांगितले. या वेळी जाधव व काजळे यांनी देखील विद्यार्थ्यांनी परीक्षेचे कोणतेही टेन्शन न घेता पेपर द्यावेत. प्रास्ताविक प्रा आशिष देशमुख यांनी केले. यावेळी आगळा वेगळा निरोप समारंभ शहीद कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित विविध भाषेत अनुवादित झालेलं शिवाजी कोण होता हे पुस्तक देऊन गौरव करण्यात आला. आभार अंजली देशमुख यांनी मानले.

# वडिलांच्या निधनानंतर मुलीने नातलग व शिक्षकांच्या पाठींब्याने दिला पेपर

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** सध्या दहावी व बारावीची परीक्षा सुरू असून बारावी परीक्षेचे पेपर चालू असताना सकाळी पितृछत्र हरवलेल्या छत्रपती शाहू उच्च माध्यमिक विद्यालयातील विज्ञान शाखेतील गीतांजली श्यामकांत निखाडे या विद्यार्थिनीच्या वडिलांचे बुधवारी सकाळी अल्पशा आजारामुळे निधन झाल्याची घटना घडली होती. बारावी विज्ञान शाखेची नियमित परीक्षार्थी असल्याने जन्मदात्या पित्याचे निधनामुळे परीक्षेचा पेपर बुडून तिचे वर्ष वाया जाऊ नये, यासाठी तिचे नातलग मंजाहरी गाढे, शाळेचे सहशिक्षक मंगेश भागवत, भुजाडे, एस एन सय्यद यांनी तिचे मनः परिवर्तन करून वडिलांच्या पार्थिवावर तिच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार केल्यावर तिला शहरातील विनायकराव पाटील महाविद्यालयात परीक्षा केंद्रात परीक्षेचा पेपर सोडवण्यासाठी रवाना करण्यात आले. डोळ्यातून अल्पशा अश्रूंना वाट मोकळी करून जन्मदात्या वडिलांच्या आठवणींना उजाळा देत या विद्यार्थिनीने बारावीचा पेपर सोडवला.



# वैजापुरात व्ही.पी. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत केले रक्तदान

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** येथील विनायकराव पाटील महाविद्यालयातिल राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, आरोग्य दक्षता केंद्र व उपजिल्हा रुग्णालय वैजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी स्वेच्छा रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते,या शिबिरात पन्नास वर तरुण विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान केले. या शिबिराचे उदघाटन प्राचार्य डॉ. शिवाजीराव थोरे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्रीमती साधना गंगावणे, जिल्हा आरोग्य समिती सदस्य धोंडीरामसिंह राजपूत,रासेयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ. साहेबराव हिवाळे,छत्रसेनेचे प्रा. श्रीकांत डोके, आरोग्य केंद्रचे डॉ.एम.एल. सोनवणे, विजय पाटील यांच्या उपस्थितीत झाले. राजपूत यांनी विद्यार्थ्यांना आवाहन करीत संबोधित केले की, रक्तदान श्रेष्ठ दान आहे, समाजाचे ऋण फेडण्यासाठी,सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान करून तरुण वर्गाने सामाजीक दायित्व पार पाडावे. याप्रसंगी डॉ. बळीराम लोणे, डॉ. लक्षकौशिक पुरी यांनी तसेच कार्यक्रम अधिकारी शरद शिंदे,समुपदेशक विजय पाटील, शशिकांत पाटील, प्रकल्प व्यवस्थापक राजेंद्र लाठे, क्षेत्रीय अधिकारी विक्रम वाळके, मनीषा जाधव यांनी सहभाग नोंदविला, शासकीय रक्तपेढी छत्रपती संभाजीनगरचे डॉ. रोहन गायकवाड, डॉ. शिवाजी पुंडे, डॉ.वैष्णवी बिस्वाल, अनुसया घोगरे, इम्रान आंबेकर, माधव पवार, चाऊस अली, माझहर भाई, ईश्वर जाधव व श्रीमती आदिती यांनी रक्त संकलन केले. शेवटी विजय पाटील यांनी आभार मानले.



# वाडी येथे पौष्टिक तृणधान्य पिकाचे आहारातील महत्वाविषयी मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**वाडी :** ता. सोयगाव येथे तालुका कृषि अधिकारी एस. जी. वाघ साहेब याच्या मागदर्शना खाली आतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष 2023 अंतर्गत पौष्टिक तृणधान्याचे मानवी आहारातीत महत्व सागून तृणधान्य पिकांची जास्तीत जास्त लागवड क्षेत्र वाढविणे साठी प्रचार प्रसिद्धी करण्यात आली. तसेच पौष्टीक तृणधान्याचे पाककृतीची माहिती देवून नागली पिकाचे पापड या पाककृतीचे महिला बचत गटाच्या माध्यमातून प्रात्यक्षिक घेण्यात आले या वेळी गावातील महिला व ग्रामस्थानी सहभाग घेतला या साठी कृषि विभागातील कर्मचारी कृषि सहाय्यक राधिका सोळुंके, भाग्यश्री वायकर व ग्रामस्थ उपस्थित होते.



# टोलनाका स्थलांतरीत करण्याबाबत संभाजी ब्रिगेड निस्वार्थ लढणार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** जिल्हाधिकारी कार्यालय येथे निवासी उपजिल्हाधिकरी तथा अपर जिल्हादंडाधिकारीहिम्मत खराडे व महाप्रबंधक (तकनीकी) एवं परियोजना निदेशक *एस. एस.कदम यांना निवेदन देण्यात आले व शिवापुर टोलमूळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या , व भोर ,वेल्हे या दोन तालुक्यातील कुंठलेला विकस व सामान्या जनतेचे जे हाल होताहेत हे सांगितले. संभाजी ब्रिगेडने या गंभीर प्रश्नाबाबत वारंवार निवेदने दिली परंतु काही स्थानिक पातळीवर बिकाऊ पुढारी व नेते आहेत यांचा यात हस्तक्षेप असल्या कारणामुळे हा प्रश्न सुटत नाही. परंतु आता स्थानिक नागरिक व शेतकरीवर्ग व इतर व्यवसायिक यांना आता सहन होण्याच्या बाहेर गेले आहे. त्यामुळे जो पर्यंत हा प्रश्न सुटणार नाही तो पर्यंत स्थानिकांकडून टोल वसुल करू नये व लवकरात लवकर टोल स्थलांतरित करण्यात यावा, अशी मागणी निवेदनातकरण्यात आली. अन्यथा संभाजी ब्रिगेड संविधानीक पध्दतीने अंदोलन किवा निषेध करण्यात येईल हा ईशारा देण्यात आला.

# धुळे जिल्हा प्रभारी अध्यक्षपदी त्रिभुवन



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्त्या व राष्ट्रवादी काँग्रेस सेवा दलाच्या धुळे जिल्हा महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. आशाताई आनंदा त्रिभुवन यांची पॅंथर्स रिपब्लिकन पार्टीच्या उत्तर महाराष्ट्राच्या महिला आघाडी अध्यक्षा पदी तथा धुळे जिल्हा प्रभारी महिला आघाडी अध्यक्षा पदी निवड झाली आहे. वरिष्ठांच्या हस्ते नियुक्तीपत्रही देण्यात आले आहे. माजी मंत्री गंगाधर गाडे व राष्ट्रीय कार्याध्यक्षा सौं. सुर्यकांताताई गाडे यांच्या आदेशानुसार सदरची नेमणुक करण्यात आलेली आहे.
सदर नेमणूकी ही पँथर्स रिपब्लिकन पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष युवा नेते नितीन तायडे तसेच शेरखान पठाण उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष (नाशिक) व जळगांव जिल्हा अध्यक्ष मा. भिकन सोनवणे यांच्या शिफारशी नुसार आशाताई त्रिभुवन यांची उत्तर महाराष्ट्र महिला आघाडी अध्यक्ष व धुळे जिल्हा प्रभारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. तळागाळातील वंचित घटकांना पक्षाच्या माध्यमातून न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचहीे सौ. आशाताई त्रिभुवन यांनी प्रसिद्ध पत्रकातून माहिती दिली आहे. त्यांच्या नियुक्ती बद्दल सर्वत्र त्यांचं कौतुक करण्यात येत असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षावही केला जात आहे.




# गॅस दरवाढीवरुन आमदार आक्रमक

## विधानभवनाच्या पायऱ्यांवर येत जोरदार घोषणाबाजी...

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** होळी रे होळी, सरकारने थापली गॅस दरवाढीची पोळी... संपला निवडणूकीचा तडाका, झाला गॅस दरवाढीचा भडका... रद्द करा रद्द करा... गॅस दरवाढ रद्द करा... खोके सरकार आले सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले... खोके सरकार आले गॅस दरवाढीचे विघ्न आणले. पुण्यात नाही चालले खोके उदास झाले बोके...या सरकारचं करायचं काय, गरीबांच्या घरात जेवण नाय... शेतकऱ्यांची लाईट तोडणाऱ्या सरकारचा धिक्कार असो... बळीराजाला द्या लाईट नाहीतर शेतकरी देईल फाईट.. महाराष्ट्राला द्या लाईट नाहीतर शेतकरी करतील टाईट... अशा गगनभेदी घोषणांनी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाचा परिसर दणाणून सोडला. अधिवेशनाच्या चौथ्या दिवशी विरोधी पक्षनेते अजित पवार आणि अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली गॅस दरवाढ विरोधात महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर येत शिंदे सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांचे बॅनर फडकवून केला निषेध.

# रविवारी रंगणार गेट गोईंगची वुमन क्रिकेट लीग १३ संघांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मागील अनेक वर्षांपासून महिलांच्या फिटनेस साठी काम करणाऱ्या गेट गोईंग संस्थेने आयोजित केलेली मिसेस फूड राईट क्रिकेट लीग २०२३रविवार ५ मार्च रोजी रंगणार आहे. १६ संघ स्पर्धेत सहभागी झाले असून आज आणि उद्या नॉक आऊट सामाने होणार आहेत. तरी रविवारी सकाळी ८ वाजेपासून अंतिम सामने होणार आहेत.

मागील एक आठवड्यापासून प्रोझोन मॉलच्या क्रिकेट टर्फवर सर्व संघ जोरदार सराव करत आहेत. सीए, डॉक्टर, गृहीणी, उद्योजिका यांच्यासह विविध क्षेत्रातील महिलांचे जवळपास १६ संघ स्पर्धेत सहभागी होत आहेत. स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच ८ ते १४वर्षे वयातील मुली आणि ८ ते १२ वर्षांपर्यंतच्या मुलास प्रत्येक संघात स्थान देण्यात आले आहे. यामुळे प्रथमच आई आणि मुलास एकत्र खेळण्याची संधी मिळेल. सर्वोत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षण या बरोबरच प्रत्येक संघातील एका उत्कृष्ट खेळाडूस बक्षिस देण्यात येणार आहे. गेट गोईंग यावर्षीचा महिला दिन क्रिकेट लिगच्या माध्यमातून आगळ्या वेगळ्या करणार आहे. जास्तीत जास्त महिलांचा फिटनेस कडे ओढा वाढावा तसेच क्रिकेटमध्ये मुलिंचे प्रमाण वाढावे हा या स्पर्धेमागचा उद्देश आहे. जास्तित जास्त शहरवासियांनी खेळाडूंचा उत्साह वाढवण्यासाठी स्पर्धेला हजेरी लावावी असे आवाहन संयोजकांनी केले आहे.स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डॉ . चारू देशमुख , नीना निकाळजे, दीपाली डाबरी, डॉ . वंदना मिश्रा , डॉ . सुजाता लाहोटी , डॉ . उमा महाजन, निरुपमा नागोरी , यांच्यासह गेट गोईंगचे सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत.



# उपविभागीय अधिकारी डॉ. मंडलिक व यादव यांनी परीक्षा केंद्रांवर केले वातावरण राईट

आधुनिक केसरी न्यूज

**महेंद्र बोराळे**

**कंधार :** तालुका हा परिक्षात कॉपी मारण्याच्या बाबतीत नावलौकिक असल्याने बदनाम झाला आहे. हा लागलेला दाग पुसुन काढण्यासाठी उपविभागीय अधिकारी डॉ शरद मंडलिक व तहसीलदार अणुपसिंह यादव यांनी चांगलीच कंबर कसली असुन तालुक्यातील परिक्षा केंद्रावर भेटी देवून वातावरण ताईट केले आहे.यामुळे कॉपी बदलांचे चांगलेच धाबे दणाणले आहे.परिक्षा कॉपी मुक्त होत असल्याने कंधारला लागलेला दाग पुसण्याचे काम उपविभागीय अधिकारी डॉ शरद मंडलिक व तहसीलदार अणुपसिंह यादव हे करत असल्याचे दिसून येत आहे. बारावीच्या परीक्षाला दिनांक 21फेब्रुवारी पासुन सुरुवात झाली आहे. कंधार तालुक्यातील 14 सेंटरवर परीक्षा चालू आहेत. परीक्षाच्या सुरवातीलाच उपविभागीय अधिकारी डॉ.शरद मंडलिक यांनी संबंधित अधिकारी यांची बैठक घेऊन कॉफी करणाऱ्यांची गय करु नका असे आदेश देण्यात आले होते. वेगवेगळे पथक स्थापन करुन परिक्षा या कॉपीमुक्त झाल्या पाहिजे या हेतूने ते प्रत्येक परिक्षा केंद्रावर प्रत्यक्ष भेट देवून हॉलची पाहणी करत आहेत. दिनांक 1मार्च रोजी उपविभागीय अधिकारी डॉ. शरद मांडलिक यांनी शेकापुर, कुरुळा येथील परीक्षा केंद्रांवर भेट देऊन पाहणी केली. यावेळी तहसीलदार अनुपसिंह यादव,तलाठी राजेश बरोडा, राम पांचाळ, मन्मथ थोटे, तलाठी केंद्रे, चालक मिर्झा जबिल बेग व शिक्षण विभागाचे कर्मचारी या वेळी उपस्थित होते. त्यामुळे परिक्षा केंद्रावर वातावरण टाईट झाले असून कॉपीविना परीक्षा सुरळीत व पारदर्शक होत आहेत.

जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी नांदेड जिल्ह्यातील परिक्षा कॉपीमुक्त करण्याचे प्रयत्न आहे. जिल्हाधिकारी यांच्या सुचनेचे पालन करत उपविभागीय अधिकारी डॉ शरद मंडलिक व कंधार तहसिलचे तहसीलदार अनुपसिंह यादव हे आपल्या महसूल यंत्रणा, शिक्षण विभागाचे कर्मचारी, अधिकारी यांना सोबत घेऊन परिक्षा कॉपी मुक्त अभियान यशस्वी पणे राबवित आहेत. कंधार तालुक्यातील शिक्षण प्रेमी यांच्याकडून अशा अधिकाऱ्यांचे अभिनंदन ही होत आहे.

# बौध्द धम्म परिषद आयोजन पूर्वतयारी बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या शांती व अहिंसा या कृतिशील विचारांचा व्यापक प्रचार आणि प्रसारासाठी सम्राट अशोका जयंतीनिमित्त नरहरी रांजणगाव येथे २५ मार्च रोजी एकदिवसीय पाचवी बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आल्याची महिती शाक्यपुत्र भन्ते अमृतानंद बोधी यांनी दिली. रविवारी त्यांनी येथील जेतवन बुद्ध विहार याठिकाणी बौद्ध धम्म परिषदेचे आयोजनासाठी उपासक आणि उपासकांची पूर्वतयारीसाठी बैठक घेतली.या बैठकीत त्यांनी बौद्ध धम्म परिषद आयोजना बद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. खेड्यापाड्यात बुद्ध विहाराची स्थिती अंत्यत बिकट झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. समाज बांधव बौद्ध विचार आणि संस्करापासून दुरावल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. बौध्द विचाराचा प्रभावीपणे प्रचार प्रसार करण्यासाठी बौद्ध धम्म परिषद आयोजित केले आहे. या कार्यक्रमाला मोठया संख्येने उपासकांनी हजर राहण्याचे आवाहन त्यांनी केले. या बैठकीला केंद्रप्रमुख ए.टी.पगारे , नगरपालिकेचे शिक्षणाधिकारी मनीष गणवीर, महसूल मंडळ अधिकारी अशोक तांबूस, तलाठी संघटनेचे जिल्हा प्रतिनिधी विनोद साळवे, नगरसेवक राजेंद्र गायकवाड, पत्रकार प्रशांत त्रिभुवन, रिपब्लिकन पार्टी ऑफ आठवले गटाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब त्रिभुवन, पोलीस पाटील अनिल धिवर, आर. टी. वाघमारे, जयप्रकाश बोरगे , प्रा. आबासाहेब कसबे, गणेश त्रिभुवन, विलास त्रिभुवन, चंद्रकांत किर्ते, जगन नन्नवरे, चंद्रसेन भोसले, सुनील अंभोरे, विजय दिवेकर, अजिंक्य त्रिभुवन, प्रविण गायकवाड यांची उपस्थिती होती.



# जिगोलो ठेवला; लग्न करण्यास नकार देताच बलात्काराच्या गुन्ह्यात अडकवला

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** एका विवाहितेने सहा महिन्यापूर्वी सहकाऱ्यासोबत जिगोलोसारखे संबंध निर्माण करून



मोबदल्यात ९५ हजार रु दिले पण त्याने लग्नास टाळाटाळ सुरु केल्यामुळे त्याच्याविरुध्द पुंडलिकनगर पोलीस ठाण्यात बलात्काराची फिर्याद देताच पोलिसांनी त्याला गजाआड केला.

**जिगोलो म्हणजे काय ?**

मुंबई व पुणे,सारख्या शहरात विवाहित किंवा अविवाहित महिला पुरुषांसोबत पैसे देऊन संबंध ठेवतात अश्या पुरुषांना जिगोलो म्हणतात. शुभम बाळू गवळी (२४) रा. न्यायनगर असे अटक आरोपीचे नाव आहे. तो हेडगेवार रुग्णालयात सफाईकामगार म्हणून काम करतो. सहा महिन्यापूर्वी त्याची ओळख त्याच्या सोबत काम करणाऱ्या एका (३४) वर्षीय विवाहितेसोबत झाली विवाहिता व आरोपीचे रोजच्या सहवासातून प्रेमसंबंध निर्माण झाले विवाहितेने १० वर्षांपूर्वी नवऱ्याला सोडून हेडगेवार रुग्णालयात नौकरी पत्करली होती.

विवाहितेने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले की, आरोपीने विवाहितेसोबत शारीरिक सम्बन्ध निर्माण केल्यावर विवाहितेने त्याला फोन पे व रोखीने ९५ हजार रु दिले आरोपीनेही विवाहितेला तुझासांभाळ करतो, तुझ्याशी लग्न करतो असे आमिष दाखवले होते पण आरोपी लग्नासाठी टाळाटाळ करत आहे व फसवतो आहे, असा निर्णय घेत आरोपी विरुध्द शोषणाची तक्रार दिली. वरील प्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक राजश्री आडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी संदीप काळे करत आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in